दैनिक

# लोकरक्षणाय

लोकशाहीच्या संरक्षणार्थ

www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com + 91 97023 86118

●कार्यकारी संपादक- अनिकेत घनश्याम भंकाळ ●वर्ष-०१,अंक-२७५ ●पृष्ठे-०४ ●ठाणे, गुरुवार, २१ मार्च २०२४ ●RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ●रु.२/-


## आशियातील सर्वात श्रीमंत महापालिकेची जबाबदारी आता 'या' अधिकाऱ्यावर

**■मुंबई, विशाल कारंडे :**

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आणि निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार देशभरात आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. केंद्रीय निवडणूक आयोगाने मुंबई महानगरपालिका आयुक्त इक्बालसिंह चहल यांना हटवल्यानंतर, ही जागा रिक्त झाली होती. आयुक्तपदासाठी तीन सनदी अधिकाऱ्यांची नावे केंद्रीय निवडणूक आयोगाकडे पाठवण्यात आली होती. यामध्ये अतिरिक्त मुख्य सचिव भूषण गगराणी महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी व बेस्टचे अनिल डिग्गीकर यांच्या नावंचा समावेश होता. अखेर भूषण गगराणी यांची मुंबई महानगरपालिका



आयुक्तपदी नियुक्ती झाली आहे. भूषण गगराणी हे ११९० केडरच्या आयएएस अधिकारी आहेत. महाविकास आघाडीचे सरकार गेल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सरकारमध्ये २०२२ ला त्यांची अतिरिक्त मुख्य सचिव म्हणून त्यांची निवड झाली होती. गगराणी यांनी महविकास आघाडीचा काळात नगरविकास खात्यात अतिरिक्त मुख्य सचिव पदी काम पाहिले आहे.

अभिजीत बांगर हे ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त होते. तिथून त्यांची बदली आता मुंबई महापालिकेत अतिरिक्त आयुक्तपदी करण्यात आली आहे. तर, मेट्रो वुमेन म्हणून ओळख असलेल्या आश्विनी भिडे यांची मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालकपदी बदली करण्यात आली आहे. आश्विनी भिडे या मुंबई महापालिकेत अतिरिक्त आयुक्तपदी होत्या. त्यांच्या जागी आता अमित सैनी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

अभिजीत बांगर यांची मुंबईत बदली झाल्यानंतर त्यांच्या जागी सौरभ राव यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सौरभ राव हे आता ठाणे महापालिकेचे आयुक्त म्हणून कारभार पाहतील. कैलाश शिंदे यांच्यावर नवी मुंबई महानगरपालिकेची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. बुलढाण्याच्या जिल्हाधिकारीपदी अंकित यांची नियुक्ती करण्यात आली आहे. जळगावच्या जिल्हाधिकारीपदी शुभम गुप्ता, तर धुळ्याचे जिल्हाधिकारी म्हणून विशाल नरवडे यांची बदली करण्यात आली आहे. मुंबई महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पी. वेलारासू यांनाही पदावरून हटवण्यात आलं आहे. तर, नागपूरच्या NMRDA च्या आयुक्तपदी संजय मीना यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर मनोजकुमार सुर्यवंशी यांना ठटपफ्ळ्अ च्या आयुक्तपदावरून हटवलं आहे.

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय निवडणूक आयोगाने महानगरपालिकांमधील आयुक्त, अतिरिक्त आयुक्त आणि उपायुक्त या पदावरील अधिकाऱ्यांच्या बदल्या आणि पदस्थापनेबाबत मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत.

## ठाणे परिवहनच्या भंगार बसमध्ये आता बनणार महिलांसाठी शौचालय

**■ठाणे, रोहीत जैसवाल :**

ठाणे परिवहन सेवेच्या भंगार बसचा आता वापर करण्याचे पालिकेने निश्चित केले आहे. त्यानुसार या भंगार बसचे रुपांतर सुसज्ज अशा शौचालयात केले जाणार असून त्याचा वापर महिलांना करता येणार आहे. या संदभार्तील निविदा ठाणे महापालिकेच्या घनकचरा विभागाने नुकतीच प्रदर्शित केली आहे. यात संबधींत ठेकेदाराने ती बस विकत घ्यायची असून त्यावरील येणारा खर्च देखील त्यालाच करावा लागणार आहे. या बदल्यात ठेकेदाराला ज्या ठिकाणी बस लावली जाणार आहे, तेथील २० टक्के परिसर वापरण्याचे अधिकार असणार आहेत. ठाणे महापालिकेच्या माध्यमातून सध्या शहरातील ९०० शौचालयांची दुरुस्ती करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. त्यानुसार हे काम ८० टक्यांच्या आसपास झाले आहे. त्यानंतर आता शौचालय सफाईची मोहीम देखील महापालिकेने हाती घेतली आहे. तर स्वच्छ शहराचा



एक भाग म्हणून ठिकठिकाणी नव्याने शौचालय उभारण्याचे कामही हाती घेण्यात आले आहे. याशिवाय मोबाइल टॉयलेट, कंटेनर टॉलयेल आदी संकल्पना देखील महापालिकेच्या माध्यमातून राबविल्या जात आहेत. त्यातही गर्दीच्या ठिकाणी किंवा हायवे लगत महिलांसाठी शौचालय उभारणीला देखील प्राधान्य दिले जात आहे. त्यानुसार आता आता परिवहनच्या भंगार बसचा वापर आता शौचालयांसाठी केला जाणार असल्याची माहिती पालिका सुत्रांनी दिली आहे. त्यानुसार पहिल्या टप्यात २ बस यासाठी घेतल्या जाणार आहेत. या संदभार्तील निविदा पालिकेच्या घनकचरा विभागाने काढली आहे. प्रायोगिक तत्वावर हा प्रयोग केला जाणार आहे, अत्याधुनिक स्वरुपाचे हे शौचालय उभारले जाणार आहे. या शौचालयांचा वापर केवळ महिलांसाठीच करता येणार आहे.

## प्रीपेड की पोस्टपेड वीज मीटर; उच्च न्यायालयात जनहित याचिकेद्वारे मागणी



**■मुंबई, विशाल पाटील :**

स्मार्ट प्रीपेड वीज मीटरच्या सक्तीच्या वापराला जनहित याचिकेद्वारे उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे. तसेच, प्रीपेड की पोस्टपेड वीज मीटरबाबतचा पर्याय निवडण्याचा अधिकार ग्राहकांना देण्याचे आदेश देण्याची मागणी करण्यात आली आहे. स्मार्ट प्रीपेड वीज मीटर बसवण्याच्या योजनेच्या अंमलबजावणीमुळे मुंबईतील झोपडपट्ट्या, चाळी आणि ग्रामीण भागात राहणाऱ्या गरीब वगार्तील नागरिकांची मोठ्या प्रमाणात गैयसोय होईल. त्यांना त्रासाला सामोरे जावे लागेल, असा दावाही मुंबईच्या माजी महापौर निर्मला प्रभावळकर यांनी उपरोक्त जनहित याचिकेद्वारे केला आहे. तसेच, प्रीपेड वीज मीटरची सक्ती करणारी केंद्र सरकारची २६ फेब्रुवारी २०२१ रोजीची अधिसूचना रद्द करावी. त्याचप्रमाणे, प्रीपेड की पोस्टपेड वीज मीटर हवा याचा पर्याय निवडण्याचा अधिकार ग्राहकांना देण्याचे आदेश सरकारला द्यावेत, अशी मागणी केली आहे. ही अधिसूचना २०२३ सालच्या विद्युत कायदा आणि ग्राहकांचे हक्कांच्या नियमांतर्गत काढण्यात आली असून सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना लागू आहे. याचिकेनुसार, ही योजना जनतेला कोणतीही माहिती आणि सूचना न देता मनमानी पद्धतीने राबवली जात आहे. संबंधित कायद्यांतर्गत प्रीपेड किंवा पोस्ट-पेड वीज मीटर निवडण्याची परवानगी देण्यात आली आहे. असे असताना ग्राहकांवर प्रीपेड वीज मीटर वापरण्याची सक्ती केली जात आहे आणि त्यांचा पर्याय निवडण्याचा अधिकार हिसकावून घेतला जात आहे, असा दावाही याचिकेत करण्यात आला आहे.

## वसई विरार महापालिकेतील ५ उपायुक्तांच्या बदल्या

**■विरार, प्रतिनिधीः**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने राज्याच्या विविध महापालिकेतील ३४ उपायुक्तांच्या बदल्या केल्या आहेत. त्यामध्ये वसई विरार मधील ५ उपायुक्तांचा समावेश आहे. लोकसभा निवडणुकीमुळेनिवडणूक आयोगाने आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त आदींच्या बदल्या करण्याचे निर्देश राज्य शासनाला दिले होते. त्यामुळेमंगळवारी संध्याकाळी नगरविकास खात्याने ३४ अधिकार्यांच्या बदल्यांचे आदेश काढले. त्यामध्ये वसई विरार मघील ५ उपायुक्तांचा समावेश आहे. बदल्या झालेल्या अधिकार्यांमध्ये उपायुक्त डॉ चारूशिला पंडित (घनकचरा), उपायुक्त डॉ विजय द्वासे (परिमंडळ प्रमुख), उपायुक्त पंकज पाटील (क्रिडा), उपायुक्त तानाजी नरळे (पाणी पुरवठा) आणि उपायुक्त नयना ससाणे (वृक्ष प्राधिकरण) आदींचा समावेश आहे. या अधिकार्यांना तात्काळ कार्यमुक्त होण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मात्र नवीन नियुक्ती कुठे करण्यात आली आहे त्याचे आदेश अद्याप काढण्यात आलेले नाहीत.



वसई विरार महापालिकेतून बदली करण्यात आलेल्या पाचही उपायुक्तांचा ३ वर्षांचा कार्यकाळ पूर्ण झाला होता. त्यामुळे या बदल्या करण्यात आल्या आहेत.

## सिडको व प्रदूषण नियंत्रण मंडळाचे दुर्लक्ष; उलवे नोड कांदळवनावर टाकला जातोय भराव

**■नवी मुंबई, नितीन देवळेकर :**

सध्या अनेक ठिकाणी माती, कचरा आणि राडारोडा टाकून खारफुटी (कांदळवन) मारली जात आहे. याकडे सिडको आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सातत्याने दुर्लक्ष सुरू आहे. त्यामुळे स्थानिक रहिवासी आणि पर्यावरणवाद्यांकडून संताप व्यक्त केला जात आहे. विकासकांच्या फायद्यासाठी अनेक ठिकाणच्या खारफुटीवर मातीचा, कचऱ्याचा भराव टाकून ती मारली किंवा नष्ट केली जात आहे. खारफुटीवर ही संरक्षित आणि निसर्गाच्या संवर्धनासाठी अतिशय महत्वाची आहे. या खारफुटीच्या संवर्धनासाठी अनेक उपाययोजना केंद्र आणि राज्य सरकारने आखल्या आहेत. याची जबाबदारी ही स्थानिक प्रशासन, वन विभाग यांची आहे. तर दुसरीकडे राडारोडा आणि कचऱ्याच्या भरावामुळे प्रदूषण निर्माण होत आहे. याकडेही या विभागाचे दुर्लक्ष होत आहे. नवी मुंबईसाठी उरण पनवेल आणि नवी मुंबईतील ज्या बेलापूर पट्टीतील शेतकऱ्यांच्या जमिनी शासनाने संपादित केल्या आहेत त्यासर्व जमिनी या समुद्र आणि खाडी किनाऱ्यावरील आहेत. येथील जैवविविधता आणि समुद्राच्या नैसर्गिक पाणी निचऱ्याची व्यवस्था



ही खारफुटीच्या सहजीवनाची आहे. मात्र विकासाच्या नावाखाली येथील नैसर्गिक प्रवाह बंद किंवा बुजवून त्याठिकाणी मातीचा भराव करण्यात आला आहे. परिणामी अनेक ठिकाणी खारफुटीत वाढ झाली आहे. मात्र खारफुटी ही समुद्राच्या लाटा आणि त्सुनामीसारख्या प्रकोपाच्या वेळी होणारी किनाऱ्याची धूप थांबवून किनारपट्टीवर जीव, जंतू प्राणी यांच्या सुरक्षेची महत्वाची भिंत आहे. त्याचे संवर्धन आणि संरक्षण ही मूळ कामगिरी खारफुटी करीत आहे. मात्र हीच नष्ट केली जात आहे. त्यामुळे खारफुटीचे संरक्षण करण्याची आवश्यकता आहे.

## कळव्यात इलेक्ट्रीक दुचाकीच्या बॅटरीचा स्फोट; तीन जण जखमी



**■ठाणे, दिगंबर जाधव :**

कळवा येथील मफतलाल कंपनी परिसरात इलेक्ट्रीक दुचाकीच्या बॅटरीचा स्फोट झाल्याने घराची भिंत कोसळून तीन जण जखमी झाले. कुसुमदेवी विश्वनाथ गुप्ता (२८), लाल बादशाह (६६) आणि मेहबूबी लाल बादशहा (५६) अशी जखमींची नावे आहेत. त्यांना उपचारासाठी ठाणे महापालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. यापूर्वी देखील इलेक्ट्रीक दुचाकीच्या बॅटरींचा स्फोट झाल्याच्या अनेक घटना समोर आल्या आहेत. त्यामुळे वाहन चालकांच्या सुरक्षेविषयी प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. मफतलाल कंपनी परिसरात शांतीनगर लोकवस्ती आहे. या लोकवस्तीमध्ये विश्वनाथ गुप्ता वास्तव्यास असून त्यांचे वाहन दुरुस्तीचा व्यवसाय आहे. त्यांनी एका इलेक्ट्रीक दुचाकीची बॅटरी घराच्या पोटमाळ्यामध्ये ठेवली होती. मंगळवारी रात्री ११.३० वाजताच्या सुमारास या बॅटरीचा स्फोट झाला. हा स्फोट इतका मोठा होता की, घराची भिंत कोसळली. त्यामुळे विश्वनाथ यांची पत्नी कुसुमदेवी या घटनेत जखमी झाल्या. तसेच शेजारी राहणारे लाल बादशाह आणि मेहबूबी हे देखील जखमी झाले. घटनेची माहिती नागरिकांना मिळाल्यानंतर त्यांनी तात्काळ ठाणे महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाला संपर्क साधला.

## पुणे पोलीस आयुक्तांचा आदेश; 'पोलिस क्लीअरन्स' होणार सक्तीचे

**■पुणे, अभिजित येरुल्लू :**

कोणत्याही ठिकाणी कामावर तरुणांना ठेवण्यापूर्वी त्यांची पोलिस दरबारी नोंद करण्याचे आदेश पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी दिले आहेत. कामगार ठेवण्यापूर्वी त्याचे पोलिस क्लियरन्स सर्टिफिकेट काढून घेणे आवश्यक असेल. या आदेशाचा भंग करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाईचा बडगा उगारण्यात येणार आहे. पिंपरी-चिंचवड शहरासह राज्यभरात घडणाऱ्या विविध प्रकारच्या गंभीर गुन्ह्यांमध्ये परप्रांतीय तरुणांचा सहभाग असल्याचे पोलिस तपासात समोर येऊ लागले आहे. यातील आरोपी तरुणांची कोठेही नोंद घेण्यात आली नव्हती. या पार्श्वभूमीवर पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी कलम १४४ क्रिमिनल प्रोसिजर कोड- १९७३अंतर्गत पोलिस क्लियरन्स सर्टिफिकेट चा आदेश जारी केला आहे. बहुतांश नागरिक






कामाच्या शोधात शहरात दाखल झाले आहेत. मात्र, ठेकेदार, मालकांकडून त्यांच्या नोंदी घेतल्या जात नव्हत्या. नोंदी नसल्यामुळे कायदेशीर कारवाई करताना पोलिसांना अनेक अडचणी येत होत्या. गेल्या काही काळात पिंपरी-चिंचवड शहरात खून, खुनाचा प्रयत्न, अल्पवयीन मुलींसोबत अनैसर्गिक अत्याचार असे गंभीर गुन्हे घडले आहेत. यांतील आरोपी परप्रांतीय असून, ऊसाचे गुऱ्हाळ, कंपनी किंवा ठेकेदारी तत्त्वावर ते काम करीत होते. मात्र, या कामगारांची अस्थापनांच्या मालकांनी माहिती घेतलेली नव्हती. यांची नोंदणी; तसेच पोलिस व्हेरिफिकेशन केले नव्हते. त्यामुळे या गुन्हेगारांना पकडताना, त्यांच्यावर कारवाई करताना पोलिसांना अनेक अडचणी निर्माण झाल्या होत्या. पिंपरी-चिंचवड शहरातील रहिवासी भागात आणि प्रार्थनास्थळांमध्ये तात्पुरता आणि खासगी रोजगार घेऊन देशविघातक कृत्ये करणारे तरुण लपून राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे काम मागण्यास आलेल्या कामगारांची इत्थंभूत माहिती घेणे आवश्यक आहे. या माहितीच्या आधारे पोलिस क्लियरन्स सर्टिफिकेट प्राप्त करता येणार आहे. सर्व प्रकारचे कामगार, कंत्राटदार, रोपवाटिका मालक, वनस्पती वितरक, सुरक्षा रक्षक एजन्सी; तसेच सर्व प्रकारचे कुशल आणि अकुशल मनुष्यबळ पुरवठा करणाऱ्या एजन्सींना हा नियम लागू असणार आहे. पोलिस क्लिअरन्स प्रमाणपत्र प्राप्त होईपर्यंत नवीन कामगारांना कामावर ठेवता येणार नाही. या आदेशानुसार जुन्या कामगारांची देखील पोलिस पडताळणी करणे बंधनकारक आहे.

कसे मिळवावे सर्टिफिकेट?

Pcs.mahaonline.gov.in या वेबसाइटवरून पोलिस क्लिअरन्स सर्टिफिकेट प्राप्त करता येणार आहे. त्यासाठी वेबसाइटवर कागदपत्र अपलोड करावी लागणार आहेत. कागदपत्रांची पडताळणी झाल्यानंतर ऑनलाइन पोलिस क्लिअरन्स सर्टिफिकेट मिळवता येणार आहे. कामगारांच्या नोंदी ठेवणे बंधनकारक करण्यात आले आहे. स्थानिक पोलिसांना याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे नोंदणी न ठेवणाऱ्या मालकांवर यापुढे कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.

## 'आपला दवाखाना'चे साहित्य चोरीस, चेंबूरमधील सह्याद्री नगरातील रहिवाशांचा पालिकेविरोधात संताप



**■मुंबई, यश सावंत :**

पालिकेने चेंबूरच्या सह्याद्री नगर परिसरात वर्षभरापूर्वी आपला दवाखाना उभारण्याचे काम सुरू केले होते. मात्र दवाखान्याच्या उभारणीचे काम अर्धवटच ठेवले. मात्र आता या आपला दवाखानाचे सर्व साहित्यच चोरीला गेल्याचे निदर्शनास आले आहे. पालिकेच्या या ढिसाळ कारभारामुळे नागरिक संतप्त झाले आहेत. दोन महिन्यांत येथे आपला दवाखाना उभा न राहिल्यास आंदोलन करण्यात येईल, असा मनसेने इशारा दिला आहे.

झोपडपट्टी आणि आसपासच्या परिसरात राहणाऱ्या नागरिकांना घराजवळ उपचार मिळवेत यासाठी संपूर्ण राज्यात आपला दवाखाना ही योजना सुरू करण्यात आली आहे. मुंबईतील अनेक झोपडपट्टी भागात पालिकेने आपला दवाखाना सुरू केले आहेत. चेंबूरच्या सह्याद्री नगर (ब) परिसरात १२ ते १५ हजार लोकवस्ती असून पालिकेने येथे आपला दवाखाना सुरू करण्याचे ठरवले होते. त्यानुसार वर्षभरापूर्वी येथे दवाखान्याच्या बांधकामाला सुरुवात करण्यात आली होती. मात्र काही दिवसांनी हे काम अर्धवट सोडण्यात आले. परिणामी, गेल्या काही दिवसात दवाखान्याच्या उभारणीसाठी आणलेले लोखंडी साहित्य चोरीला गेले आहे. दरम्यान पालिकेच्या एम पूर्व कार्यालयाबाहेर बेमुदत उपोषणाचा इशारा अणुशक्ती विधानसभा उपविभाग अध्यक्ष राजेश पुरभे यांनी दिला आहे.

## ठाण्याच्या जागेसाठी मनोमिलन; मुख्यमंत्र्यांचे 'धनुष्य' गणेश नाईकांच्या खांद्यावर

**■नवी मुंबई, सचिन कदम :**

महायुतीच्या जागावाटपात ठाणे लोकसभेची जागा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पदरात पडणार हे जवळपास स्पष्ट असले तरी याठिकाणी मुख्यमंत्र्यांचा उमेदवार कोण असेल याविषयी मात्र संभ्रम अजूनही कायम आहे. नवी मुंबईतील एका शासकीय सोहळ्यानिमित्त गेल्या आठवड्यात मुख्यमंत्री आणि या भागातील भाजपचे नेते गणेश नाईक एकत्र आले होते. यावेळी मुख्यमंत्री आणि नाईकांमधील देहबोली कमालीची सकारात्मक होती असे प्रत्यक्षदर्शींचे म्हणणे आहे. नाईकांचा सत्कार करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी महापालिकेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांना केल्या असे म्हणतात. लोकसभा निवडणुका तोंडावर असताना





या दोन नेत्यांमधील आदरभावने अनेकांच्या भुवया उंचावल्या असून शिवसेनेच्या धनुष्यबाणावर माजी खासदार राहिलेले नाईकांचे पुत्र संजीव निवडणुकीच्या रिंगणात उतरतील का अशी नवी चचार्ही यानिमीत्ताने सुरु झाली आहे.

नवी मुंबई महापालिका आणि सिडकोच्या वेगवेगळ्या विकासकामांच्या भूमीपूजनाचा एक सोहळा गेल्या आठवड्यात दूरदृश्य प्रणालीद्वारे मुख्यमंत्र्यांच्या वर्षा निवासस्थानावर आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्यासाठी स्थानिक आमदार म्हणून गणेश नाईक आणि मंदा म्हात्रे उपस्थित होत्या. यावेळी मुख्यमंत्र्यांच्या स्वागतानंतर त्यांच्याच सुचनेवरुन महापालिका प्रशासनाने गणेश नाईकांचे केलेले विशेष स्वागत अनेकांसाठी लक्षवेधी ठरले. त्यानंतर आपल्या भाषणात मुख्यमंत्र्यांनी नाईकांचा उल्लेख अनेकवेळा 'दादा' असा केला. आजवरच्या आपल्या भाषणात मुख्यमंत्र्यांनी या शब्दाचा उल्लेख टाळल्याचे पहायला मिळाले होते.

ठाणे लोकसभेची जागा शिवसेनेच्या पदरात पडणार असल्याने नवी मुंबईतून नाईक समर्थकांचे पुरेपूर पाठबळ मिळणे मुख्यमंत्र्यांसाठीही आवश्यक आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नावावर ही निवडणूक होणार असल्याने भाजप नेते म्हणून नाईकांना महायुतीच्या उमेदवाराच्या प्रचारात झोकून देऊन काम करावेच लागणार असले तरी त्यांचे समर्थक मात्र नेमकी कोणती भूमीका घेतात हेही पहाण्यासारखे ठरेल. या पार्श्वभूमीवर शिवसेनेच्या धनुष्यबाण या चिन्हावर संजीव नाईक यांनी निवडणूक लढवतील अशी चर्चा गेल्या काही दिवसांपासून सुरु झाली असून यामुळेशिवसेनेच्या गोटात मात्र अस्वस्थता पसरली आहे.

नवी मुंबईत नाईक आणि मुख्यमंत्री समर्थकांमध्ये विस्तवही जात नाही. असा काही प्रयोग झालाच तर आम्ही वेगळ मार्ग पत्करू असा इशाराच मुख्यमंत्री समर्थक खासगीत बोलताना देऊ लागले आहेत. ठाण्यातील शिवसेनेत असा काही प्रयोग होईल ही शक्यता अगदीच कमी असल्याची चर्चा असली तरी याविषयीचा संभ्रम मात्र कायम आहे. नाईक कुटुंबियांनी अथवा संजीव नाईक यांनी यासंबंधी जाहीर भाष्य अद्याप केलेले नाही.

## कल्याण परिमंडळात दोन महिने एकोणीस दिवसांत २४४७ गुन्हे दाखल

**■ठाणे, भावना जैन :**

नवीन वर्षात अवघ्या दोन महिने एकोणीस दिवसांत कल्याण पोलीस परिमंडळ-३ मध्ये २४४७ गुन्हे दाखल झाले असून त्यात डोंबिवलीचे मानपाडा पोलीस ठाणे पहिल्या क्रमांकावर आहे. ०१ जानेवारी ते १९ मार्च २०२४ दरम्यान मानपाडा पोलिस ठाण्यात ४१७ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. गुन्हेगारी घटनांमध्ये कोळसेवाडी पोलीस ठाणे दुसऱ्या क्रमांकावर आहे. येथे एकूण ३९२ घटनांची नोंद झाली आहे. तसेच परिमंडळ तीनमध्ये तिसऱ्या क्रमांकावर असलेल्या डोंबिवलीच्या रामनगर पोलिस ठाण्यात ३४९ गुन्हे दाखल झाले आहेत. कल्याण पोलीस परिमंडळ-३ मधील आठ पोलीस ठाण्यांपैकी अन्य पाच पोलीस ठाण्यांबाबत बोलायचे झाल्यास, गुन्हेगारी घटनांमध्ये



डोंबिवलीचे विष्णुनगर चौथ्या, कल्याणचे महात्मा फुले पोलीस ठाणे पाचव्या, डोंबिवलीचे टिळकनगर सहाव्या, कल्याणचे बाजारपेठ सातव्या तर खडकपाडा पोलीस ठाण्यांचा आठवा क्रमांक लागतो. कल्याणच्या अतिरिक्त पोलिस आयुक्त कार्यालयाच्या माहितीनुसार, डोंबिवलीचे मानपाडा पोलिस ठाणे गुन्हेगारी घटनांमध्ये पहिल्या क्रमांकावर आहे. हॉटेल्स, बार, रेस्टॉरंट याशिवाय एमआयडीसीच्या शेकडो कंपन्या या परिसरात असून, त्या ठिकाणी दररोज काही ना काही गुन्हेगारी घटना घडत असतात. दुसऱ्या क्रमांकावर कल्याण पूर्वेतील कोळसेवाडी पोलिस ठाणे असून, येथे उघड गुन्हेगारीसह राजकीय गुंडगिरी शिगेला पोहोचली आहे. कल्याण परिमंडळ-३ मध्ये आठ पोलिस ठाण्यांचा समावेश आहे. पोलिस अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रत्येक पोलिस ठाण्यात ०१ अधिकारी आणि ०२ कर्मचारी असे एकूण २४ पोलिस कर्मचारी आठ पोलिस ठाण्याच्या परिसरात गस्त घालतात, हे क्षेत्रफळ आणि लोकसंख्येच्या दृष्टीने बादलीतल्या थेंबाप्रमाणे आहे.

- मानपाडा पोलीस स्टेशन- ४१७,
- कोळसेवाडी पोलीस ठाणे- ३९२,
- डोंबिवली पोलीस स्टेशन- ३४९,
- विष्णुनगर पोलिस स्टेशन- ३०६,
- महात्मा फुले पोलीस स्टेशन- २६२,
- टिळकनगर पोलिस स्टेशन- २४२,
- बाजारपेठ पोलीस स्टेशन- २४१,
- खडकपाडा पोलीस स्टेशन- २३८.

//सुविचार
माणसाचे जगण्याचे उद्दिष्ट चांगले असले की त्याची वृत्ती आपोआप चांगली होते. //



# स्वयंपाकघरातल्या उपयोगी टिप्स

**स्वयंपाकघरात महिलांचा बराच वेळ जातो. जेवण बनवण्यापासून अन्नपदार्थांची साठवणूक करेपर्यंत महिलांना बरंच काही करावं लागतं. त्यातच भाज्या, त्यातही पालेभाज्या ताज्या ठेवणं हे मोठं आव्हान असतं. यासाठी स्वयंपाकघरातल्या या टिप्स उपयोगी पडतील.**

▮पालेभाज्या ओलसर होऊ नयेत यासाठी विशेष काळजी घ्यावी लागते. त्यातच आपल्याकडे विशिष्ट प्रकारचे कंटेनर्स असतातच, असं नाही पण पालेभाज्या ताज्या ठेवण्यासाठी सोपी पद्धत वापरता येईल. कंटेनरमध्ये भाजी ठेवा. त्यावर पेपर टॉवेल किंवा टिश्यू पेपर गुंडाळा. त्यावर



प्लास्टिक गुंडाळा. पेपर टॉवेलमुळे पालेभाजीतला सगळा ओलावा शोषला जाईल. पालेभाजी बऱ्याच काळापर्यंत ताजी राहील.

▮लसूण सोलणं हे वैतागवाणं काम असतं. यात खूप वेळ जातो. पण लसूण सोलण्याचीही सोपी पद्धत आहे. लसणाच्या पाकळ्य काढून घ्या. या पाकळ्या हवाबंद कंटेनरमध्ये ठेवा. झाकण लावा आणि कंटेनर जोरात हलवा. लसणाची सालं झटपट निघतील.

▮रस काढण्यासाठी आपण फळं थोडी नरम करून घेतो. पण याऐवजी रस काढण्याआधी फळं १० ते ३० सेकंदांसाठी मायक्रोवेव्हमध्ये ठेवता येतील. यामुळे सगळा रस झटपट काढता येईल.

▮उकडलेलं अंडं सोलणं ही एक कला आहे. चुकीच्या पद्धतीने अंडं सोलल्यास खराब होतं. अंडं सोलण्याची एक सोपी पद्धत आहे. एका ग्लासमध्ये अंडं ठेवून त्यात पाणी भरा. ग्लासच्या वरच्या भागावर हात ठेवून जोरात हलवा. अंडं सोललं जाईल.


▮पिझ्झाचा कुरकुरीतपणा टिकून राहावा यासाठी एक सोपा उपाय करता येईल. मायक्रोवेव्हमध्ये पिझ्झासोबत पाण्याचा ग्लासही ठेवा. यामुळे पिझ्झाचा कुरकुरीतपणा टिकून राहील.

**सध्या तरुणी फॅशनेबल राहणे पसंत करतात. त्याचबरोबर त्या फॅशनेबल कपडेही घालतात. मग ते एखाद्या तरुणीने दुसऱ्या तरुणीच्या अंगावर घातलेले पाहिले की, तिलाही तसे कपडे घालण्याची आवड निर्माण होते. मग तिची ती आवड तिच्या लूकला सूट करो अथवा ना करो, ती तरुणी ते कपडे घालते. सध्या बदलत्या फॅशननुसार लोकही बदलत असतात. तेही उन्हाळा, पावसाळा, हिवाळा असे त्या त्या ऋतूमधले कपडे घालतात.**

# ट्रान्सपरंट कुर्तीजची फॅशन परतली



पहिले अन्न-वस्त्र-निवारा या लोकांच्या गरजा मानल्या जात असत, मात्र आता बदलत्या ऋतूनुसार बदलणे ही गरज आहे. आता बाजारात चलती आहे ती चायना जीन्स व त्यांवर वेअर केलेल्या ट्रान्सपरंट टॉपची. या टॉपमधून इनर घातले जाते. इनरची किंमत १०० पासून २०० रुपयांपर्यंत असते. तर या टॉपची किंमत २०० ते ५०० रुपयांपर्यंत असते. ही फॅशन सर्वसाधारण लोकांच्या खिशाला परवडणारी आहे. या टॉपचा फायदा उन्हाळ्यात व




पावसाळ्यात खूप होतो. उन्हाळ्यात घातले की गरम होत नाही व पावसाळ्यात घातले की लवकर सुकते. त्या जीन्स व टॉपवर तरुणी डिझायनर लॉकेट वेअर करतात. हातात प्रिंटेड बांगड्या व कानामध्ये मोठ्या साईजचे कानातले सिल्व्हर किंवा गोल्डमध्ये घालतात. या टॉपमध्ये निळा, गुलाबी, पांढरा, काळा अशा रंगांना जास्त मागणी आहे. पण एक मात्र खरं बदलत्या काळानुसार आपले राहणीमान बदलत राहावे ही चांगली



# बदाम तेल आणि दुधाने तयार करा हेअर मास्क



**केसांना** केमिकलपासून वाचवून उचित पोषण देणे आवश्यक आहे. जर आपल्याला सुंदर आणि स्वस्थ केस हवे असतील पर बदाम तेल आणि दुधाने तयार केलेला हेअर मास्क लावावा. अशा प्रकारचे नैसर्गिक हेअर मास्क तयार करणे सरळ आणि प्रयोग करण्यात सुरक्षित असतात. तर ज्या दिवशी आपल्याला केस धुवायचे असतील त्याच्या २० मिनिटांआधी हे हेअर मास्क लावावे.



**पाहा हे तयार करण्याची कृती :**
२ चमचे बदाम तेल आणि २ चमचे दूध एक वाटीत घेऊन मिक्स करा. हे मिश्रण केसांच्या मुळाला लावा आणि काही मिनिटांसाठी मसाज करा. नंतर २० मिनिटांसाठी हे मास्क केसांमध्ये लावलेले राहू द्या. नंतर कोमट पाणी घेऊन हलक्या शाम्पूने केस धुऊन टाका.

# वृद्धावस्थेत त्वचेची देखरेख

**चेहऱ्यावरील** सुरकुत्या वृद्धत्वाची पहिली चाहूल असते. वाढत्या वयामुळे त्वचा ढिली होते व त्यात कोरडेपणा येतो, ज्यामुळे मान, डोळे आणि ओठ त्यांच्या भोवताली रेषा उमटायला लागतात. याच रेषांना आपण सुरकुत्या म्हणतो. वाढत्या वयाच्या जीर्णतेचे ते लक्षण आहे. त्वचेच्या बाह्य आवरणाखाली ज्या कोषिका असतात त्या कॅलॉजेन आणि इलॅस्टिन नामक प्रोटीन तंतूपासून बनतात. जे त्वचेला कवच प्रदान करतात, लवचिकपणा आणि मृदुता देतात. वय वाढल्यामुळे इलॅस्टिन कमी होते आणि कॅलोजेनचे विघटन होते, परिणामस्वरूप कोषिकांची लवचिकता कमी होते. चेहऱ्यावरील या सुरकुत्या टाळण्यासाठी रोज नियमित मसाज केला तर फायदा होतो. मसाजमुळे रक्तसंचार वाढतो. ज्यामुळे त्वचेच्या आतवर असलेल्या रक्तवाहिन्यांना पुरेशा प्रमाणात प्राणवायू पोहोचतो. दिवसभरातून ७-८ ग्लास पाणी पिणे आणि सकाळी लिंबू पाणी मध टाकून घेणे याचाही त्वचेसाठी चांगला फायदा होईल. सुरकुत्यांप्रमाणे डोळ्याखाली काळी वर्तुळेसुद्धा त्वचेच्या सौंदर्यासाठी बाधक ठरतात. मानसिक तणाव, निद्रानाश आणि आहारातील असमतोलपणा यासाठी कारणीभूत असतो. यासाठी पपई नेहमी खावी, पालकाचे सूप प्यावे या बाबींचा अवलंब केल्यास त्वचा निरोगी राहील आणि वृद्धत्वाची प्रक्रिया टाळता आली नाही तरी लांबविता मात्र नक्की येईल. वृद्धात्वाला रोग न मानता अनिवार्य, स्वाभाविक क्रिया समजून आनंदाने, सुख-समाधानाने जीवन व्यतीत करावे.





**चालणे हे व्यायाम म्हणून चांगले असते, त्यामुळे दिवसातील ठरावीक वेळ प्रत्येकाने चालायला हवे, असे आपण अनेकदा ऐकतो आणि वाचतोदेखील. मग सकाळच्या वेळात, जेवणानंतर चालल्यास ते जास्त फायदेशीर ठरते असेही म्हटले जाते. मात्र चालण्याचा व्यायाम इतरही काही कारणांसाठी फायदेशीर ठरू शकतो. तुम्ही काम करून कंटाळला असाल आणि तुम्हाला थोडा आराम हवा असेल तर चालणे हा उत्तम उपाय ठरू शकतो. चालण्यामुळे विविध कारणांनी निर्माण होणारा ताण कमी होण्यास मदत होते. त्यामुळे चालणे सुरू करा आणि काय आहेत त्याचे फायदे,**

# चालण्याचा व्यायाम 'या' गोष्टींसाठी फायदेशीर

**मधुमेहावर उपयुक्त**

टाइप २ मधुमेहासाठी चालण्याचा व्यायाम अतिशय उपयुक्त ठरतो. दररोज ठरावीक प्रमाणात चालण्याचा व्यायाम केल्यास रक्तातील साखरेची पातळी समतोल राहण्यास मदत होते. त्यामुळे मधुमेह असणाऱ्यांनी आपले वजन कमी किंवा जास्त असले तरीही न चुकता व्यायाम करणे आवश्यक आहे.

**मेंदू तल्लख होण्यासाठी फायदेशीर**

मेंदूच्या पेशी कार्यान्वित होण्यासाठी चालण्याचा व्यायाम अतिशय उपयुक्त ठरतो. मेंदू तल्लख झाल्यामुळे त्याचा अनेक बाबतीत फायदा होतो. त्यामुळे इतर शारीरिक त्रास शोधणेही सोपे जाते.

**दीर्घायुष्यासाठी उपयुक्त**

चालण्यामुळे तुमच्या शरीरातील सर्व यंत्रणा उत्तम पद्धतीने कार्यरत राहतात. याशिवाय प्रतिकारशक्ती वाढण्यासाठीही चालणे अतिशय उपयुक्त असते. नियमित चालण्याचा व्यायाम करणारे लोक त्यांच्या वयापेक्षा कमी वयाचे दिसतात. त्यांच्यात कमी वयात मृत्यू होण्याचे प्रमाणही अत्यल्प असते.

**वजन वाढण्यास प्रतिबंध**

चालण्याच्या व्यायामामुळे वजन वाढण्यावर काही प्रमाणात निर्बंध येतात. याशिवाय वाढलेले वजन कमी करण्यासाठीही चालण्याचा अतिशय उपयोग होतो. शरीरातील मेटाबॉलिझम संतुलित ठेवण्यासाठी चालण्याचा फायदा होतो. चालण्यामुळे शरीरातील चरबी कमी होण्याबरोबरच स्नायूंची ताकद वाढण्यास मदत होते.

**ताण दूर करण्यासाठी फायदेशीर**

चालण्याचा शरीरातील हॉर्मोन्सवर चांगला परिणाम होतो. चालण्यामुळे हे हॉर्मोन्स ॲक्टिव्ह होतात आणि तुम्ही नकळत फ्रेश झाल्यासारखे वाटते. त्यामुळे कामाचा किंवा इतर कोणताही ताण कमी करायचा असले तर चालणे हा अतिशय सोपा उपाय आहे. तसेच चालण्यामुळे डोक्यातील नकारात्मक आणि ताण वाढविणारे विचार कमी होतात आणि तुम्हाला काही प्रमाणात आनंदी वाटू लागते. म्हणूनच चालणे हा व्यायामाचा अतिशय सोपा असा प्रकार म्हणता येऊ शकतो. यामुळे शरीर आणि मन या दोन्हींवर चांगला परिणाम होतो.

आरोग्यदायी आयुष्य जगण्यासाठी हे अतिशय उपयुक्त असते. तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार दिवसातील केवळ अर्धा तास चालल्यास ते निश्चितच फायदेशीर ठरू शकते. ज्यांना व्यायामासाठी वेगळा वेळ काढणे शक्य होत नाही अशांनी दैनंदिन कामे करताना, ऑफिसला जाताना चालावे. यामध्येही वय आणि त्या व्यक्तीची प्रकृती यांनुसार चालण्याचा वेग, कालावधी ठरवल्यास उत्तम.

# वाणी ज्ञानेश्वरांची

तैसें भलतेथ भलतेणें भावें । भलतेंही हो अथवा नोहावें । परि तें मी ऐसें आघवें । होऊनि ठेले ॥

त्याचप्रमाणे, पाहिजे तेथे पाहिजे त्या भावनेने पाहिजेल ते होवो अथवा न होवो, परंतु ते सर्व ह्यमीच आहेह्ल अशी ज्यांचे मनाची वृत्ती होऊन गेली आहे.

अगा हे जेव्हडी माझी व्याप्ती । तेव्हडीचि तयांची प्रतीती । ऐसे बहुधाकारी वर्तती । बहुचि होउनी ॥

अजुर्ना माज्या स्वरूपाची जितकी व्यापकता आहे, तेवढाच त्यांचा बोध आहे; म्हणून अनेकप्रकाराने जग दिसले तरी त्या अनेक रूपात मीच आहे, असा ते व्यवहार करतात.

हें भानुबिंब आवडे तया । सन्मुख जैसें धनंजया । तैसे ते विश्वा या । समोर सदा ॥

ज्याप्रमाणे सूर्यबिंब सर्वांना आपल्यासमोर सारखेच दिसते, त्याप्रमाणे ते सर्व विश्वाला बोधाने व्यापक असल्यामुळे सन्मुखच असतात.

अगा तयांचिया ज्ञाना । पाठी पोट नाहीं अजुर्ना । वायु जैसा गगना । सर्वांगीं असे ॥

अजुर्ना, त्यांच्या ज्ञानाला आतबाहेर असा भेद नाही, ज्याप्रमाणे वायू हा आकाशात सर्वत्र भरलेला आहे.

तैसा मी जेतुला आघवा । तेंचि तुक तयांचिया सद्भावा । तरी न करितां पांडवा । भजन जहालें ॥

त्याप्रमाणे मी जेवढा संपूर्ण आहे, तेवढाच त्यांचा अस्तित्वभाव आहे. म्हणजे दोघांचे माप सारखे आहे, असा ज्याचा बोध आहे, त्याने भजन जरी न केले तरी ते सहजच घडते.

एंहवीं तरी सकळ मीचि आहें । तरी कवणीं कें उपासिला नोहें? । एथ एके जाणणे नवीण ठाये । अप्राप्तासी ॥

एंहवी तरी मी सर्वत्र भरलेला आहे. माझी कोण उपासना करीत नाहीत? सर्वांची सर्व ठिकाणी सहजच उपासना चालली आहे, असे असूनही ज्यांना मी अप्राप्त आहे, त्यांची उपासना माझे यतार्थ ज्ञान नाही म्हणून थांबल्यासारखी झाली आहे.

परि तें असो येणें उचितें । ज्ञानयज्ञें यजितसांते । उपासिती मातें । ते सांगितले ॥

परंतु हे असो, या योग्य ज्ञानयज्ञाने यज्ञ करून जे माझी उपासना करतात, ते भक्त तुला सांगितले.

अखंड सकळ हें सकळां मुखीं । सहज अर्पत असे मज एकीं । कीं नेणणें यासाठीं मूर्खीं । न पविजेचि मातें ॥

सदासर्वकाली जी जी कर्मे होतात, ती सर्व बाजूने मला सहज पावतात, परंतु हे मूर्खांना समजत नसल्यामुळे मी त्यांना प्राप्त होत नाही.

तोचि जाणिवेचा जरी उदयो होये । तरी मुद्दल वेदु मीचि आहें । आणि तो विधानातें जया विये । तो क्रतुही मीचि ॥

त्याच ज्ञानाचा उदय झाला असता मुख्य वेद मीच आहे, त्यात विधी-अनुष्ठान जे सांगितले आहे तो ऋतुही (यज्ञ) मीच.

मग तया कमार्पासूनि बरवा । जो सांगोपांगु आघवा । यज्ञु प्रकटे पांडवा । तोही मी गा ॥

मग हे पांडवा, त्या कमार्पासून प्रकट होणारा जो यथाविधी यज्ञ, तोही मीच आहे.

स्वाहा मी स्वधा । सोमादि औषधी विविधा । आज्य मी समिधा । मंत्रु मी हवि ॥


देवास हवी देण्याचा मंत्र मी, पितरासही हवी देण्याचा मंत्र मी, सोमवल्ली वगैरे नाना प्रकारच्या औषधी मी, घृत मी, समिधा मी, मंत्र मी, होमद्रव्य मी.

होता मी हवन कीजे । तेथ अग्नी तो स्वरूप माझें । आणिक हुतक वस्तू जें जें । तेही मीचि ॥

ऋत्विज मी, ज्यात हवन करावयाचे तो अग्नीही माझे स्वरूप आहे आणि अग्नीत हवन करण्याच्या ज्या ज्या वस्तू, त्याही मीच आहे.

पैं जयाचेनि अंगसंगें । इये प्रकृतीस्तव अष्टांगें । जन्म पाविजत असे जगें । तो पिता मी गा ॥

हे पाहा-ज्याच्या अंगसंगाने अष्टांग प्रकृती ही जगास प्रसवते, तो जगत्पिता मी.




अर्धनारीनटेश्वरीं । जो पुरुष तोचि नारी । तेवीं मी चराचरीं । माताही होय ॥

अर्धनारी नटेश्वर स्वरूपात ज्याप्रमाणे पुरुष तोच स्त्री व स्त्री तोच पुरुष असतो, त्याप्रमाणे स्थावरजंगमाची माताही मी.

आणि जाहाले जग जेथ राहे । जेणें जीवित वाढत आहे । तें मी वांचूनि नोहे । आन निरुतें ॥

आणि उत्पन्न झालेले जग ज्या ठिकाणी राहते व ज्या योगाने प्राणिमात्राचे रक्षण होते, ते निःसंशय माज्याशिवाय दुसरे कोणी नाही.

इयें प्रकृतिपुरुषें दोन्हीं । उपजलीं जयाचिया अमनमनीं । तो पितामह त्रिभुवनीं । विश्वाचा मी ॥

प्रकृती व पुरुष ही दोन्ही ज्याच्या अंतःकरणोपाधिरहित स्वरूपात म्हणजे निर्गुणस्वरूपात उत्पन्न होतात, तो या त्रिभुवनात विश्वाचा आजा मीच.

आणि आघवेया जाणणेयाचिया वाटा । जया गांवा येती गा सुभटा । वेदांचिया चोहटां । वेद्य जें म्हणिजे ॥

अजुर्ना, सर्व ज्ञानाच्या वाटा ज्या गावात येऊन मिळतात व चारी वेदांच्या चव्हाट्यावर ज्याला वेद्य असे म्हणतात.

जेथ नानामतां बुझावणी जाहली । एकमेकां शास्त्रांची अनोळखी फिटलीं । चुकलीं ज्ञानें जेथ मिळों आलीं । जें पवित्र म्हणिजे ॥

ज्या ठिकाणी पुष्कळ प्रकारची मते ऐक्यतेस आली. शास्त्रांची एकमेकांशी ओळख झाली व चुकलेली ज्ञाने जेथे एकत्र मिळाली, असे जे स्थान त्याला पवित्र असे म्हणतात.

पैं ब्रह्मबीजा जाहला अंकुरु । घोषध्वनीनादाकारु । तयाचें गा भुवन जो ॐकारु । तोही मी गा ॥

हे पाहा, ब्रह्मबीजाला परा, पश्यन्ती, मध्यमा आणि वैखरी या चार वाचा हेच अंकुर फुटल्यावर त्यांचे मंदिर जो ॐकार तोही मीच होय.

जया ॐकाराचिये कुशीं । अक्षरें होतीं अउमकारेंसीं । जियें उपजत वेदेंसीं । उठलीं तिन्हीं ॥

ज्या ॐकाराच्या पोटी अ, उ व म (अकार, उकार व मकार) अशी अक्षरे उत्पन्न होतात व जी उपजल्याबरोबर तीन वेद उत्पन्न झाले.

## दै. लोकरक्षणाय सुडोकू - ३७

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | | 1 | 9 | | | 2 | 3 | 5 |
| 2 | 8 | | | 6 | | 4 | | |
| | 9 | | | | 7 | | | 1 |
| | 1 | | 2 | 3 | | 5 | | |
| 4 | | 7 | | | | | 9 | 3 |
| | | 8 | | | | | | |
| | 5 | | | 4 | 2 | | | 8 |
| | 6 | | | 9 | | | 1 | |
| 7 | | 9 | | | | | | |

## उत्तर सुडोकू -३६

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | 5 | 1 | 6 | 7 | 2 | 4 | 8 | 9 |
| 6 | 9 | 7 | 4 | 8 | 3 | 5 | 1 | 2 |
| 2 | 4 | 8 | 9 | 5 | 1 | 6 | 3 | 7 |
| 8 | 1 | 6 | 7 | 2 | 5 | 9 | 4 | 3 |
| 9 | 2 | 4 | 1 | 3 | 6 | 7 | 5 | 8 |
| 5 | 7 | 3 | 8 | 9 | 4 | 1 | 2 | 6 |
| 4 | 6 | 9 | 2 | 1 | 8 | 3 | 7 | 5 |
| 1 | 3 | 2 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 4 |
| 7 | 8 | 5 | 3 | 4 | 9 | 2 | 6 | 1 |

एक ते नऊ आकडे आडव्या व उभ्या सरळ रेषेत अशा प्रकारे भरायचे की एका रेषेत एक आकडा एकदाच आला पाहिजे. प्रत्येक सरळ रेषेत आणि ३ बाय ३ च्या प्रत्येक लहान चौकात सर्व एक ते नऊ आकडे आलेच पाहिजेत. आधीच्या छापील आकड्यांची अजिबात हलवाहलव करायची नाही. प्रत्येक कोड्याला एकच उत्तर आहे.

## दिनविशेष

**२१ मार्च**

- १५५६: ख्रिश्चन धर्मात सुधारणांची आवश्यकता आहे असे सांगणार्‍या आर्चबिशप थॉमस क्रॅनमर यांना शिक्षा म्हणून जिवंत जाळण्यात आले.
- १६८०: शिवाजी महाराजांनी कुलाबा रायगड किल्ल्याची बांधणी सुरू केली.
- १८५८: इंग्रज सेनापती सर ह्यू रोझ यांनी झाशीस वेढा दिला.
- १८७१: ऑटो व्हॉन बिस्मार्क हे जर्मनीचा चॅन्सेलर बनला.
- १९३५: शाह रझा पेहलवी यांनी पर्शियाचे नाव ईराण करावे असे आवाहन केले.
- १९७७: भारतातील आणीबाणी संपुष्टात आली.
- १९८०: अमेरिकेने मॉस्को ऑलिम्पिक खेळांवर बहिष्कार टाकला.
- १९९०: नामिबियाला दक्षिण अफ्रिकेपासून स्वातंत्र्य मिळाले.
- २०००: फ्रेंच गयानातील कोअरु येथून एरियन ५०५ या वाहकाद्वारे भारताचा इन्सॅट ३ बी हा उपग्रह यशस्वीपणे प्रक्षेपित करण्यात आला.
- २००३: जळगाव महानगरपालीकेची स्थापना.
- २००६: सोशल मीडिया साइट ट्विटर ची स्थापना झाली.
- २०१२: आंतरराष्ट्रीय वन दिन
- १७६८: फ्रेन्च गणितज्ञ व भौतिकशास्त्रज्ञ जोसेफ फोरियर यांचा जन्म. (मृत्यू: १६ मे १८३०)
- १८४७: कालजंत्रीकार बाळाजी प्रभाकर मोडक यांचा जन्म. (मृत्यू: २ डिसेंबर १९०६)
- १८८७: देशभक्त, क्रांतिकारक व भारतातील कम्यूनिस्ट पक्षाचे संस्थापक मानवेंद्रनाथ रॉय यांचा जन्म. (मृत्यू: २६ जानेवारी १९५४)
- १९१६: भारतरत्न शहनाईवादक बिस्मिल्ला खान यांचा जन्म. (मृत्यू: २१ ऑगस्ट २००६)

## भविष्य

**मेष** दूरच्या प्रवासाचा योग येईल. जास्त धाडस करू नका. व्यावसायिक प्रगतीचे दर उघडेल. सर्वांशी गोडीगुलाबीने वागाल.

**वृषभ** व्यावसायिक बदलाचे वारे मनात वाहू लागतील. कामाच्या ठिकाणी तुमचे वर्चस्व वाढेल. मुलांकडून चांगल्या बातम्या मिळतील.

**मिथुन** मनातील आकांक्षा विनासायास पूर्ण होतील. तरुण वर्गाने कसलीही घाई करू नये. मुलांकडून शुभ वार्ता मिळतील. योग्य ठिकाणी गुंतवणूक करावी.

**कर्क** महत्त्वाच्या कागदपत्रांची काळजी घ्यावी. वरिष्ठांना नाराज करू नका. धार्मिक कायार्चा लाभ घ्यावा. भावंडांची काळजी लागून राहील. कलाकारांना प्रसिद्धी मिळेल.

**सिंह** तुमचा मनमोकळा स्वभाव इतरांच्या नजरेत भरेल. वरिष्ठांच्या शाबासकीस पात्र व्हावे. प्रेमप्रकरणातील जवळीक त्रासदायक ठरू शकते. कौटुंबिक स्वास्थ्य जपावे.

**कन्या** मुलांचा व्रात्यपणा वाढू शकतो. कामात चिकाटी ठेवावी लागेल. जोडीदाराची प्राप्ती वाढेल. जुन्या कामातून लाभ संभवतो. अति अपेक्षा बाळगू नका.

**तुला** हाती सोपवलेले काम वेळेत तडीस न्याल. कामात कसलीही घाई उपयोगाची नाही. डोके ठिकाणावर ठेवून वागावे. कौटुंबिक बाजू ध्यानात घेऊन वागावे. घेतलेल्या कष्टाचे चीज होईल.

**वृश्चिक** जोडीदाराशी अनबन टाळावी. स्वकष्टाने आर्थिक बाजू सुधाराल. आपल्या वागण्याने कोणी दुखवणार नाही याची काळजी घ्यावी. सत्य-असत्याची खातरजमा करावी.

**धनु** बाह्यरुपावर भुलू नका. काटकसरीचा मार्ग अवलंबाल. नवीन आव्हानाला सामोरे जाल. तुमची काम करण्याची शक्ति वाढेल. तुमचा आत्मविश्वास वाढीस लागेल.

**मकर** सर्वांशी मधुर वाणीने बोलाल. कौटुंबिक जबाबदारी वाढू शकते. तुमच्या संभाषणाची उत्तम छाप पडेल. कामात अधिक उत्साह येईल. तुमची महत्त्वाकांक्षा वाढीस लागेल.

**कुंभ** व्यवहारी बुद्धिमत्ता वापराल. काही गोष्टींचे धोरण ठरवावे लागेल. सामाजिक गोष्टींची जाणीव ठेवावी. गुरूजनांचा आशीर्वाद लाभेल. तुमची मानमान्यता वाढेल. फसवणुकीपासून सावध राहावे.

**मीन** नैराश्याला बळी पडू नका. फसवणुकीपासून सावध राहावे. मैत्रीचे नाते जपावे. जमिनीच्या कामास गतीमानता येईल. अति श्रमाचा थकवा जाणवेल. जवळचा प्रवास घडेल. जोडीदाराविषयी मतभेद संभवतात.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore. RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118. Office contact no. 97023 86118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

## संपादकीय

# महाविलंबित महानाट्य

**महाराष्ट्रातील** महानेत्यांपासून महाचतुरांपर्यंत सर्वांची नुसती धावाधाव चालू आहे. गल्ली ते दिल्ली नुसता धुरळा उडतोय. दिल्लीला दिवसाआड फेऱ्या होत आहेत. कालचे शत्रू आज गळ्यात गळे घालत आहेत. काही अक्कडबाज जुने वैर विसरायला तयार नाहीत. त्या निमित्ताने आपल्या किमतीचे लेबलही नव्याने लिहित आहेत. काही जण दिल्लीतील तारांकित हॉटेलांमध्ये निमंत्रणाची वाट पाहात अस्वस्थ येरझाऱ्या घालत आहेत. पतिवियोगानंतर मैदानात उतरलेल्या रणरागिणी थेट दिल्ली दरबारात धडक द्यायला निघत आहेत. कालपर्यंत मोठ्या नेत्यांना शिव्या देताना ज्यांनी शब्दकोश रिते केले; ते आता भावभक्तीने त्यांच्या लोटांगणी जात आहेत. काहींना अचानक कंठ फुटून ते ह्यसख्खा भाऊ, पक्का वैरीचा फड लावत आहेत. काही भुरट्यांना अचानकच आपण फार मोठे नेते झाल्याचा साक्षात्कार होतो आहे. काहींची मजल थेट नंदीबैलाला कौल लावेपर्यंत गेली आहे. पण त्यांचा आवाज काही अजून महादेवां पर्यंत पोहोचायला तयार नाही. अनेक उतावळे नवरे गुडघ्याला बाशिंगे बांधून धावूही लागलेत. साहेबांनी, दादांनी, ताईंनी, भाऊंनी, नानांनी आपल्याला हिरवा कंदील मागेच दिलाय, असे छातीठोक सांगत आहेत. काही पित्यांना आपली कन्या किती गुणाची आणि फितुरीचा मोह कशी टाळणारी, याचे कौतुक दाटून येत आहे. अनेक रया गेलेले सरदार वार्धक्य सावरत खलबतखाने गाजवत आहेत. चारी मुंड्या चीत करून टाकू.. असा नावडत्या उमेदवाराबद्दल मिशील पीळ भरत आहेत. असा महाराष्ट्रदेशी एकूण मोठाच कोलाहल माजून राहिला आहे. उद्या आपल्या मतपत्रिकेवर नेमकी कोणती नावे कोणत्या युती-आघाडीकडून आणि कोणत्या चिन्हावर उमटणार, याची शाश्वती राज्यातील बहुसंख्य मतदारांना नाही. मात्र, भविष्यात आपली सेवा करण्यासाठी चाललेली ही शर्थ पाहून त्याचे अंतःकरण भरून येत असेल! राजकारण भावनाशून्य आणि गळेकापू असते, असे उगाचच म्हटले जाते. प्रत्यक्षात काँग्रेस पक्ष सोडताना ज्येष्ठ नेते कसे (धाय मोकलून?) रडले; याची साक्ष खुद्द राहुल गांधी यांनी शिवतीर्थावर काढली. तेव्हा, मॅडमच्या चरणी अश्रुपात करणारे नेते ते आपण नव्हे; असा खुलासा काही ज्येष्ठ नेत्यांनी केला. पक्ष आणि जुनी सोबत सोडताना सगळे नेते व त्यांचे झिलकरी असे रडू लागले तर महाराष्ट्रातील धरणे नाही तरी निदान काही बंधारे तरी निश्चित भरून वाहू लागतील. सध्या नाहीतरी तशी गरज दिसतेच आहे. टँकर वाढत चालले आहेत. सगळीकडून पळवापळवी, फोडाफोडी करताना आता त्याला 'महा' म्हणायचे असते. म्हणजे, 'महा'राष्ट्रात महायुती आणि महाआघाडी यांचा महासंघर्ष. यासाठी चालणाऱ्या महानाट्यात काही अभिनेते मंचावर दीर्घकाळ राहतात आणि अचानक एग्झिट घेतात. म्हणजे, वंचित बहुजन विकास आघाडीचे प्रकाश आंबेडकर. ते अगदी शिवतीर्थावरील विरोधकांच्या सभेलाही गेले. पण आता 'इंडिया'चा भाग न बनता काँग्रेसला केवळ सात जागांवर पाठिंबा देऊ म्हणतात. म्हणजे काँग्रेसही खूष आणि इतरत्र वंचितचे उमेदवार आलेच तर भाजपही खूष. काही कसबी कलावंत विंगेत दबा धरून बसतात आणि शेवटच्या क्षणी एंट्री घेतात. राज ठाकरे आता कोणते डायलॉग बोलणार, ते सध्या दिल्लीत ठरत आहे. ते अर्थातच कोणत्याही बाजूचे संवाद तितक्याच समर्थपणे आणि तितक्याच तडफेने बोलू शकतात. दुसऱ्या झेंड्याखाली गेल्यावर लगेच चेहरा पाडून बसणाऱ्यांनी हे जरा शिकायला हवे. या सगळ्या गदारोळात ह्यआम्ही काय जन्मभर सतरंज्याच उचलायच्या का? हा एक सनातन आणि सात्त्विक संतापाचा सूर कोणीही ऐकून घ्यायला तयार नाही. आपल्याच पक्षाचा अमुक उमेदवार कसा महाडँबिस आहे आणि श्रेष्ठींना केवळ 'छन छन' हाच आवाज कसा ऐकू येतो; हेही खासगीत सांगणारे अनेक सर्वपक्षीय नेते असतात. दरवेळी महाराष्ट्रात जे घमासान होते; ते यावेळी शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या फुटींमुळे आणि त्यांच्या गुणी 'मित्रां'मुळे कित्येक पटींनी वाढले आहे. यातून नेमकी वाट काढण्याचे शहाणपणाची कसोटी पाहणारे मोठेच आव्हान मतदारांसमोर उभे राहणार आहे. या साऱ्या धुमश्चक्रीमधून उद्या लोकसभेत महाराष्ट्राचे प्रश्न मांडणारे, तेथे प्रभावी बोलू शकणारे, प्रत्येक गोष्टीत तोडबाजी न करणारे, जातीपातींचे हिशेब विसरणारे लोकप्रतिनिधी मिळणार आहेत का, हा प्रश्नच आहे. सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाला तुमच्या घड्याळ चिन्हासोबत हे चिन्ह हंगामी व न्यायालयाच्या अंतिम निकालाधीन आहे असे लिहिण्यास सांगितले आहे. न्यायालयाचा हा आदेश योग्य आहे. पण महाराष्ट्रातील असंख्य पुढारी, अनेक छोटे-मोठे गट, कथित लढाऊ संघटना आणि वाहत्या भुरट्यांच्या कपाळांवर आमच्या या निष्ठा हंगामी असून त्या वाढत्या मोबदल्याच्या आधीन आहेत... अशी गुप्त अक्षरे कोरलेली आहेत. ती न्यायालयांना किंवा मतदात्यांना कशी वाचता येणार?

# 'मी' मज हरपून..



**समोर** विरोधक नावालाही नसलेल्या निवडणुकीत रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन हे ८७ टक्के मते पडून विजयी झाले. पुढील काळात उरलेल्या १३ टक्क्यांची मते का मिळाली नाहीत आणि मुख्य म्हणजे ते १३ टक्के कोण याचा शोध घेण्याचा प्रयत्न पुतिन करणारच नाहीत, असे नाही. गेल्या पाच निवडणुकांत ते अशाच मताधिक्याने निवडून आले. त्या निवडणुकांत त्यांचे जे काही विरोधक होते ते नंतरच्या निवडणुकांत दिसेनासे होत गेले. एक सरळ क्रेमलिनसमोर गोळ्या घालून मारला गेला तर दुसरा तुरुंगात अचानक कोसळला. आणखी कोणी लंडनच्या उद्यानात विषबाधेने गेले तर कोणाचा मृतदेह परदेशातील त्याच्या निवासस्थानाच्या न्हाणीघरात आढळला. अर्थात यातील कोणाही हत्येचे मारेकरी कधीही सापडले नाहीत आणि त्यांचा शोध घेण्याची, त्यांस शासन केले जावे याची गरज बहुतांश सामान्य रशियनांस वाटली नाही. या सामान्य रशियनांचा पुतिन यांच्यावर विश्वास आहे. ते आपल्या देशास पुन्हा गतवैभव आणून देतील यावर या नागरिकांची श्रद्धा आहे. असे हजारो, लाखो नागरिक पुतिन यांच्या या निवडणूक विजयाने भारावून जात क्रेमलिनसमोर गर्दी करते झाले. आपल्या चाहत्यांचे हे प्रेम पाहून त्यामुळे पुतिनही भारावून गेले आणि मग त्यांनी उपस्थितांस रशिया जर पुन्हा कधी महान होणारच असेल तर ते फक्त मीच कसे करू शकतो यावर मार्गदर्शन केले.

गेली २४ वर्षे हे असेच सुरू आहे आणि पुतिन यांच्या प्राणात प्राण आहेत तोपर्यंत हे असेच सुरू राहील. कारण आपणास रशियाच्या अध्यक्षपदी तहहयात राहता यावे अशी घटनादुरुस्ती पुतिन यांनी स्वहस्तेच करून घेतली असून त्यामुळे त्यांना आव्हान निर्माण होण्याची सुतराम शक्यता नाही. जे आव्हान देतात त्यांचे काय होते हे अलेक्सी नावाल्नी यांचे अलीकडे काय झाले यावरून दिसते. त्यामुळे सामान्य रशियनांतून कोणी पुतिन आव्हानवीर निर्माण होणे अवघड. पुतिन आज ७१ वर्षांचे आहेत आणि त्यांची प्रकृती ठणठणीत आहे. त्यामुळे ह्यत्याह्ल आघाडीवरही काही विशेष घडण्याची आशा रशियनांस नसावी. तेव्हा जे काही रशियात सुरू आहे त्यावरून या अशा सामान्यांबाबत काही प्रश्न जरूर पडतात. पुतिन यांच्या या दणदणीत विजयामुळे यातील काही प्रश्नांस भिडणे समयोचित ठरेल.

या प्रश्नांतील मुख्य मुद्दा म्हणजे लोकशाही. रोजचे जगणे हेच आव्हान वाटणाऱ्या सामान्यांच्या मनांत आपल्या देशात लोकशाही आहे की हुकूमशाही असे काही प्रश्न उमटतात काय? परिस्थितीस सामोरे जाताना, समोरची आव्हाने पेलताना कोणाच्या आई-माईचा उद्धार करणाऱ्या दोन-पाच शिव्या देणे हीच आणि इतपतच ज्यांची अभिव्यक्ती असू शकते त्यांच्यासाठी अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा अधिक व्यापक अर्थ तितका महत्त्वाचा असतो काय? वास्तविक रशिया ही साम्यवादाची गंगोत्री. रशियन राज्यक्रांतीप्रसंगी लेनिनने घालून दिलेल्या वैचारिक मार्गाने अनेक देशांनी पुढे प्रवास केला. पण नव्वदच्या दशकात रशियातच या साम्यवादाचा पराभव होत गेला आणि तत्कालीन रशियन अध्यक्ष मिखाईल गोबार्चेव्ह यांनी स्वहस्ते स्वदेशाचे विघटन होऊ दिले. तोपर्यंतचा रशिया हा अक्राळ-विक्राळ, प्रचंड होता आणि अर्थव्यवस्था मोठी नसेल, त्याचा भव्य आकार हा अचंबित करणारा मुद्दा होता. गोबार्चेव्ह यांच्या लोकशाही-प्रेमाने आपला घात झाला असे नंतरच्या बोरिस येल्तसिन यांनी थेट म्हटले नसले तरी त्यांचे उत्तराधिकारी पुतिन हे तसे बोलून दाखवू लागले. सामान्यांस आपल्या कथित गतवैभवाचे नेहमीच आकर्षण राहिलेले आहे. त्यामुळे; पूर्वी आपण महान होतो, पण अमुक-तमुकने आपली वाताहत केली. मला संधी द्या, मी पुन्हा आपल्या देशास त्या महानपदी नेतो, असे सांगणारा नेता अनेकांस नेहमीच आकर्षून घेतो. अशा देशांत प्रत्यक्ष प्रगती मोजमापाच्या कोणत्याच यंत्रणा नसल्याने आणि त्या मोजमापाबाबत प्रश्न विचारणारी माध्यमेही सत्ताशरण झाल्याने कसलेच वास्तव समोर येत नाही. अशा विरोधशून्य, प्रश्नशून्य वातावरणात पुतिन यांच्यासारख्यांचा उदय होतो आणि त्यांचा अस्त कसा असेल याचा विचारही करता येत नाही. त्यात आपल्या साम्यवादी देशात पुतिन हे चर्चच्या धर्मसंस्थेला उघड पाठिंबा देतात आणि प्रसंगी चर्चमध्येही जातात. त्यामुळे आपला अध्यक्ष आपल्यासारखाच आहे हे सामान्यांच्या मनावर सहज बिंबते आणि पुतिन यांच्यासारख्यांचा खुंटा न हलवताच बळकट होत जातो. धर्मसत्ता ही राजसत्तेच्या प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष पाठिंब्याशिवाय फोफावू शकत नाही. पोप हेच जेव्हा रोमचे राजे होते तेव्हा ख्रिश्चन धमार्चा प्रसार अधिक झाला आणि सौदी संस्थापक महंमद बिन इब्न सौद यास पाठिंबा देण्याच्या शर्तीवर त्याने महंमद वहाब याच्या धर्मसत्तेस मदत केल्याने त्या परिसरात वहाब-पंथाचा विस्तार झाला. या अशा धर्मसत्ता-राजसत्ता साटेलोट्याचे अनेक दाखले आढळतील. सद्यःस्थितीत रशियातील चर्चच्या सर्व गरजा पुतिन सुयोग्यपणे भागवत असल्यामुळे त्यांच्या राजवटीस धर्मसत्तेचा उघड पाठिंबा आहे. आणि जेव्हा सामान्यजन ज्यांच्यासमोर पापक्षालनासाठी, दैवी साहाय्यासाठी नतमस्तक होतात ती धर्मसत्ता हीच सत्ताधीशास पाठिंबा देताना दिसते तेव्हा सत्ताधीशांची सत्ता अधिक खोलवर रुजते. वास्तविक हे सर्व परस्पर-हितसंबंध रक्षण आहे, हे कळण्याइतकी समज सामान्यांस नसते. ही अशी सर्व समीकरणे जेव्हा जुळून येतात तेव्हा हुकूमशहाचा उदय होतो आणि त्याची सत्ता अबाधिताकडे वाटचाल करू लागते.

रशियात पुतिन यांचे असे झाले आहे. त्यामुळे त्यांचे परत अध्यक्षपदी येणे हा मुद्दा सध्याच्या निवडणुकीत रशियनेतरांसाठी कधीच महत्त्वाचा नव्हता. त्यांच्या मते खरा प्रश्न म्हणजे पुतिन पुन्हा अध्यक्षपदी येऊन नक्की करणार काय? बहुतांश रशियन अभ्यासकांत या प्रश्नाच्या उत्तरात एकमत दिसते. ते म्हणजे गेली २४ वर्षे त्यांनी जे केले तेच पुढील सहा वर्षे ते करणार. याचे कारण त्याखेरीज अन्य काही ते करू शकत नाहीत. तसा प्रयत्न जरी त्यांनी केला तरी लोकांस लोकशाहीचे स्मरण होईल आणि मग त्यांची तुलना गोबार्चेव्ह यांच्याशी होऊ लागेल. ते पुतिन यांस परवडणारे नाही. सर्व लोकशाही व्यवस्थांस भेडसावणाऱ्या समस्या जवळपास सारख्याच असतात. म्हणून त्यामुळे लोकशाहीस तिलांजली देणारे अनेकांस आवडू लागतात. म्हणजे तिकडे अमेरिकेत पुन्हा अध्यक्षपदी येऊ पाहणारे डोनाल्ड ट्रम्प. मी निवडून आलो नाही तर अमेरिकेत रक्तपात होईल, असे ते उघड म्हणतात आणि मला सत्ता मिळाल्याखेरीज रशिया पुन्हा गतवैभव मिळवू शकणार नाही, असे पुतिन म्हणतात. यातील साम्य हा योगायोग नाही. पुतिन यांनी पुन्हा अध्यक्षपदी निवडून आल्यावर केलेले भाषण हे सत्य अधोरेखित करेल. आपण क्रायमिआबाबत केलेली कृती योग्यच, युक्रेनवर हल्ला तर करायलाच हवा, तो तर आपलाच भाग, आपल्याच देशाचे विघटन आपण कसे काय सहन करणार, मी ते होऊ देणार नाही, मला कोणा पाश्चात्त्य ताकदीने विरोध केला तर तिसरे महायुद्ध होईल इत्यादी इत्यादी त्यांची विधाने रशियाच्या उद्धारासाठी आपणाखेरीज तुम्हा पामरांस कसा पर्याय नाही, हे सामान्य रशियनांना सांगतात. म्हणूनच पुन्हा एकदा अध्यक्षपदी निवड झाल्यावर पुतिन हेच सांगत राहतील. त्यांना तेच सांगत राहावे लागेल आणि माझ्याशिवाय तुम्हास तरणोपाय नाही, हेच बिंबवत राहावे लागेल. समोर विरोधक आणि प्रश्न विचारणारी माध्यमे दोन्ही नसल्याने त्यांच्या या कार्यात अजिबात अडथळा येणार नाही. या अशा 'मी' पणात हरपून बसलेले नेते हे लोकशाहीसमोरील खरे आव्हान असे इतरांस वाटत असले तरी सामान्य रशियनांस त्याची झळ बसत नसल्याने पुतिन फोफावणे अटळ.

# बदलापुरात दोन दिवसात शेकडो होर्डिंग्जवर कारवाई

## आता बदलापूर शहर होणार चकाचक



■ **बदलापूर**: लोकसभा निवडणूकीसाठी आदर्श आचार संहिता जाहीर झाल्यानंतर शहरातील बॅनर, होर्डिंग्ज हटविण्यासाठी नगर परिषद प्रशासन सज्ज झाले आहे. आतापर्यंत बदलापूरातील शेकडो लहानमोठे होर्डिंग्ज हटविण्यात आले असून येत्या एक दोन दिवसात संपूर्ण शहर होर्डिंग्जमुक्त होण्याची चिन्हे दिसत आहेत.

लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर गेल्या दोन महिन्यांपासून राजकीय हालचालींना वेग आला होता. राजकीय पक्षांकडून विविध कार्यक्रम उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. विविध विकासकामांची भूमिपूजने, उद्घाटन सोहळे रंगले होते. त्याशिवाय राजकीय पक्षांच्या बैठका, मेळावे आणि सभाही झाल्या होत्या. अनेक नेत्यांचे दौरेही झाले होते. त्यामुळे शहरात होर्डिंग, पोस्टर, बॅनर्सचे पेव फुटले होते. मात्र शनिवारपासून लोकसभा निवडणूकीसाठी आदर्श आचारसंहिता लागू झाल्यानंतर शहरातील होर्डिंग्ज हटविण्यासाठी नगर परिषद प्रशासन ॲक्टीच मोडवर आले आहे. मंगळवारपर्यंत नगर परिषदेच्या अतिक्रमण विरोधी पथकाने कुळगाव बदलापूर नगर परिषद हद्दीतील पाचशेहून अधिक मोठे आणि साडे तीनशेहून अधिक लहान होर्डिंग्ज हटवले आहेत.

- त्याशिवाय आचारसंहिता जाहीर झाल्यानंतर शहरातील विविध राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांना त्यांनी शहरात ठिकठिकाणी उभारलेले होर्डिंग्ज काढून घेण्याचे आवाहन करण्यात आले होते.
- त्यानुसार अनेक राजकीय पदाधिकाऱ्यांनी स्वतःहून त्यांचे होर्डिंग्ज काढून घेतलेले आहेत. त्यामुळे शहरातील बहुतांश होर्डिंग्ज हटले असून बुधवारपर्यंत शहरातील सर्वच्या सर्व होर्डिंग्ज हटविण्यात येतील, अशी माहिती नगर परिषदेच्या अतिक्रमण विरोधी पथकातील अधिकाऱ्यांनी दिली. त्यासोबतच विविध विकासकामांच्या कोनशिला झाकण्याचे कामही सुरू असल्याचे या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

# निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुंब्रा पोलिसांचे संचलन



■ **मुंब्रा**: लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुंब्रा पोलिसांनी संचलन केले. लोकसभा निवडणुका शांततेत व भयमुक्त वातावरणात पार पडण्यासाठी हे संचलन करण्यात आले. परिमंडळ१ चे उपायुक्त सुभाष बुरसे व सहाय्यक कोळेकर यांच्या नेतृत्वाखाली मुंब्रा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल शिंदे यांनी हे संचलन केले.

यावेळी मुंब्रा पोलीस ठाण्याचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. कौसा येथून या संचलनाला मुख्य मार्गावरुन प्रारंभ झाला. दारुल फलह, अमृतनगर, शंकर मंदिर, शमशादनगर, संजय नगर, मुंब्रा पोलीस स्टेशन, शैलेशनगर मार्गे मुंब्रा रेल्वे स्टेशन एम गेट पर्यंत हे संचलन करण्यात आले. लोकसभेची निवडणूक कोणत्याही दबावाला बळी न पडता शांततेत व भयमुक्त वातावरणात पार पाडावी व लोकांना निर्भयपणे मतदान करण्यास प्रवृत्त करावे या उद्देशाने हे संचलन करण्यात आल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल शिंदे यांनी दिली. समाजकंटकांना आळा घालण्याच्या सुचना देतानाच, कोणत्याही प्रकारची अफवा पसरवून कायदेशीर व्यवस्थेवर परिणाम करणाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

# दिवावासियांच्या सेवेत आणखी दोन नवीन आरोग्य केंद्रे

■ **दिवा**: दिव्यातील साबे गाव येथील पालिका शाळेजवळएक व दातीवली गाव येथील हनुमान मंदिराजवळएक अशा दोन नवीन आरोग्य केंद्रांच्या कामाचे रमाकांत मढवी यांच्या हस्ते आज भूमिपूजन झाले. मातोश्री नगर, गणेश पाडा येथील आरोग्य केंद्र व हिंदुहृदयसम्राट वंदनीय बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना यांना दिवेकरांचा मिळणारा उत्स्फूर्त प्रतिसाद लक्षात घेता दिवा शहरात आणखी दोन नवीन आरोग्य केंद्रे सुरु होणार आहेत. त्यामुळे दिवेकरांच्या आरोग्याची परवड आता आणखी कमी होणार. प्रभाग क्रमांक २७ मधील साबे गाव, ठामपा शाळेजवळ नवीन आरोग्य केंद्राच्या कामाचे व प्रभाग क्रमांक २८ मधील दातीवली गावातील हनुमान मंदिराजवळ आरोग्य केंद्राच्या कामाचे भूमिपूजन शिवसेना शहरप्रमुख, माजी उपमहापौर रमाकांत मढवी यांच्या हस्ते पार पडले. यावेळी प्रभाग क्रमांक २७ येथे शिवसेना माजी नगरसेवक शैलेश पाटील, अमर पाटील, उपशहर प्रमुख ॲड. आदेश भगत, विभाग प्रमुख निलेश पाटील उपस्थित होते.


# Woman jumps from Atal Setu bridge, search operations on

■ **Mumbai** :

A 43-year-old woman and doctor by profession jumped from the newly constructed Atal Setu bridge on Monday. The Nhava Sheva police, along with coastal and Mumbai police, have launched a search operation but are still to trace her in the deep sea. Sources said this would be the first case of a suicide attempt on the Atal Setu bridge. According to the police, the woman has been identified as Kinjal Kantilal Shah, 43, a resident of Dadar. Kinjal's father, Kantilal, approached the Bhoiwada police in Dadar and informed them about her disappearance. The police filed a missing complaint and started the investigation. "The woman stayed with her father and had been unwell for the past many years. The father alleged in his statement that she was depressed for the last 8 to 10 years and was undergoing treatment. However, we filed a missing complaint and started the investigation," said Subhash Borate, senior police inspector, at Bhoiwada police station. The family found a suicide note at home and approached the police with it. "She left home informing her father that she was going out for some work. When the father reached home, he found a suicide note in which mentioned she was going to Atal Setu bridge," said a police officer. Borate further said, "The Bhoiwada police checked the CCTV footage, which showed that she left the house at 1.30 pm on Monday. At around 1.45 pm, she boarded a taxi from the Shindewadi area in Dadar and went towards Atal Setu bridge. Around 14 kilometres away towards Navi Mumbai on the bridge, she stopped the taxi saying she wanted to click pictures. After she got down, she jumped into the sea. The taxi driver then approached the police," added Borate. "We are taking help from the motor vehicle department, which has a rescue boat to trace the woman in the deep sea. We have also informed all the coastal police stations to see if they find any dead body on the coast in the jurisdiction," added Borate. "Since yesterday we have been searching for the woman with the help of coastal police and other local villagers and rescuers. But are yet to trace her. On Monday itself we took the statement of the taxi driver who claims that the woman asked him to take the Atal Setu bridge as she wanted a fun ride on the bridge and see it. We also called her relative today for a statement and meanwhile, the search operation is still going on," said Rajendra Kote Patil, senior police inspector, Nhava Sheva police station. On Saturday, a Pune-based woman, who is also a doctor, was passing from the Atal Setu Bridge with her husband and son. "She was clicking a picture or selfie when she fell from the bridge. But in the sea below the bridge, work was going on, and workers were stationed. As soon as she fell, the team working below rescued the woman, and she was safely reunited with the family," added Patil.



# "Winning an IPL trophy is a dream of mine", says Virat




■ Bangalore

Star batter Virat Kohli on Tuesday hoped to emulate the Royal Challengers Bangalore women's WPL winning feat and add the IPL trophy to the team's cabinet in the upcoming edition of the league, starting from March 22. The Royal Challengers defeated Delhi Capitals on Sunday to clinch the WPL in the second edition, but their male counterparts have been waiting for the title-winning moment for the last 16 years. "It was absolutely amazing. When they won it [WPL], we were watching. Hopefully, we can double it up with the trophies and that will be something truly special," said Kohli. "That's a dream of mine to know what it feels like winning an IPL trophy. I will try my very best with my abilities, my experience to be able to do that for the fans and the franchise," said the former captain of RCB.

## फुटपाथवर झोपलेला चिमुरडा बेपत्ता

■ **ठाणे** : ठाणे स्थानक परिसरात कोपरी येथे कुटुंबासह झोपलेला दोन वर्षीय मुलगा बेपत्ता झाला आहे. पित्याने कोपरी पोलीस ठाण्यात मुलगा बेपत्ता झाल्याची तक्रार नोंदवली आहे. मित्राशी भांडण झाल्याने त्यानेच मुलाला पळवून नेल्याचा संशय व्यक्त केला आहे. कोपरी पोलीस अधिक तपास करत आहेत. विकास चिंतामण पवार( ३० ) असे तक्रारदाराचे नाव असून तो आपली पत्नी व तीन मुली आणि एक मुलगा राज याच्यासोबत मैत्री बारच्या बाजूच्या फुटपाथवर झोपला होता. त्याच दिवशी तक्रारदाराचा मित्र संतोष उर्फ मिथुन पप्पु यादव ( ४० ) याच्याशी त्याचे भांडण आणि हाणामारी झाली होती. तेव्हा संतोष याने तुझ्या मुलाला उचलून घेऊन जाईन अशी धमकी दिली होती.

## अनधिकृत गाळे भुईसपाट

■ **कल्याण**: कल्याण - डोंबिवली महापालिका आयुक्त डॉ. इंदू राणी जाखड यांच्या निर्देशानुसार व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाचे उपायुक्त अवधूत तावडे यांच्या मार्गदर्शनाखाली ' आय ' प्रभागाच्या सहाय्यक आयुक्त हेमा मुंबरकर यांनी कल्याण पूर्वेतील द्वारली, मलंगरोड आणि दावडी येथील एकूण ९ अनधिकृत गाळ्यांवर निष्कासनाची धडक कारवाई केली आहे.यापैकी बहुतांश गाळे हे बांधकाम साहित्य व्यावसायिकांचे होते. ही कारवाई पालिकेचे पोलीस कर्मचारी, अनधिकृत बांधकाम विभागाचे कर्मचारी यांच्या मदतीने आणि जेसीबीच्या सहाय्याने करण्यात आली.

## कचऱ्याला लावलेल्या आगीत कार जळून खाक


■ **भिवंडी** : भिवंडी शहरातील जब्बार कंपाऊंड येथे मोठ्या प्रमाणात कचरा जमा झाला होता.त्याच्या दुर्गंधीने परिसरातील नागरिक हैराण झाले असताना या साचलेला कचरा अज्ञाताने जाळला. कचरा पेटत असताना त्याचे आगीचे धग त्या ठिकाणी उभ्या करून ठेवलेल्या कार (गाडी) पर्यंत पोहचल्याने या आगीत संपूर्ण कार जळून खाक झाली आहे. ही आग मोठ्या प्रमाणावर पसरू लागल्याने स्थानिक नागरिकांनी भिवंडी महापालिकेच्या अग्निशामक दलास आगीच्या घटनेची माहिती दिली. त्यामुळे अग्निशामक दलाचे जवानांनी घटनास्थळी धाव घेऊन आग विझवण्यासाठी प्रयत्न सुरू केले.

# मीरा–भाईंदरमध्ये १७ हजार नवीन मतदारांची वाढ

## मीरा–भाईंदर विधानसभा मतदारसंघाची निवडणूक तयारी पूर्ण

■ **मीरा रोड** : लोकसभा निवडणुकीचा कार्यक्रम निवडणूक आयोगाने जाहीर केला आहे. त्यानुसार मीरा-भाईंदर विधानसभा मतदारसंघाची लोकसभा निवडणुकीसाठीची तयारी पूर्ण झाली आहे, अशी माहिती निवडणूक नायब तहसीलदार प्रदीप मुकणे यांनी दिली आहे. यावर्षी लोकसभा निवडणुकीत मीरा भाईंदर विधानसभा १७ हजार १० नवीन मतदारांची वाढ झाली आहे. आतापर्यंत ७ हजार १०९ मतदारांची नावे यादीतून वगळण्यात आली आहेत. आचारसंहिता लागू झाली आहे. ठाणे लोकसभा मतदारसंघात सहा विधानसभा मतदारसंघ आहेत. मीरा- भाईंदर विधानसभा मतदारसंघाची निवडणुकीची तयारी पूर्ण झाली असल्याची माहिती निवडणूक नायब तहसीलदार मुकणे यांनी दिली. यावर्षी मीरा-भाईंदर विधानसभा मतदार संघात निवडणुकीसाठी चार लाख ३९ हजार २८३ मतदार आहेत. पुरुष मतदारांची संख्या दोन लाख ३३ हजार २८३, तर महिला मतदारांची संख्या दोन लाख पाच हजार ६२५ असून, चार तृतीयपंथी मतदार आहेत.

निवडणूक आयोगाचे निर्देश येईपर्यंत नवीन मतदार नोंदणीची प्रक्रिया सुरू राहणार आहे. त्यामुळे येणाऱ्या मतदानापर्यंत मतदार संख्येत आणखी वाढ होऊ शकते. गेल्या निवडणुकीत मतदारांची संख्या चार लाख २२ हजार २७३ होती. निवडणूक आयोगाने विशेष मोहीम राबवून मृत, दुबार नोंदणी, त्याचप्रमाणे स्थलांतरित मतदारांची विशेष पाहणी केली. त्यानंतर सात हजार १०९ मतदारांची नावे यादीतून



वगळली आहेत. यावेळी मतदार यादीत जवळपास सर्व मतदारांचे छायाचित्रे शंभर टक्के छापण्यात आली असल्याचे सांगितले आहे. निवडणूक प्रशासनाने निवडणुकीसाठी ७४ ठिकाणी मतदान केंद्राची उभारणी केली आहे. त्यामध्ये ४५१ मतदान बूथ असणार आहेत. यात शाळा, सभागृह व मंडप यांचा समावेश असून यावेळी निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशांनुसार सर्व मतदान बूथ हे तळमजल्यावर असणार आहेत. आचारसंहिता नियमांचे तंतोतंत पालन करण्यासाठी तीन स्थायी व तीन भरारी पथके स्थापन केली आहेत. पथके २४ तास कार्यरत राहणार आहेत. प्रचाराच्या जाहीर सभा, फेऱ्या, चौक सभा, मंडप इ. परवानगी देण्यासाठी स्वतंत्र पथक नेमण्यात आले आहे. ३५०० श्रेणी १ ते श्रेणी ४ चे कर्मचारी निवडणुकीसाठी काम करत आहेत. लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने मीरा-भाईंदर शहरातील कामकाज करण्यासाठी भाईंदर पश्चिम येथील तहसीलदार कार्यालय मतदारसंघाचे कार्यालय म्हणून तयार केले आहे. मीरा-भाईंदर विधानसभा मतदारसंघासाठी ५६३ मतदान यंत्रांची मागणी आयोगाकडे करण्यात आली आहे. मीरा रोड येथील रॉयल कॉलेजमध्ये मतदान यंत्रांचे वाटप व स्वीकृती करण्यासाठी स्टॉंग रूम तयार करण्यात आले आहेत.

■ ८५ वर्षांवरील वयोवृद्ध मतदार व दिव्यांग मतदारांना घरातून मतदान करता यावे, यासाठी १२ डी हा अर्ज भरून निवडणूक कार्यालयाकडे जमा करावा लागणार आहे. यासाठी स्वतंत्र कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. हे कर्मचारी मागणीनुसार त्या मतदारांच्या घरी फॉर्म नेऊन देतील व पुन्हा भरून घेतील. त्यामुळे त्यांना मतदान करण्यास अडचण येणार नाही. गेल्या निवडणुकीपेक्षा या निवडणुकीत जास्त मतदानाचा टक्का वाढेल, अशी अपेक्षा प्रदीप मुकणे यांनी व्यक्त केली आहे.

# वाडा येथील भाजप मेळाव्यात धक्काबुक्की आणि हमरातुमरी

■ **वाडा** : लोकसभा निवडणुकीचे बिगुल वाजताच सोमवारी वाडा येथील झालेल्या कार्यकर्ता मेळाव्यात भिवंडी लोकसभेचे उमेदवार कपिल पाटील यांचे निष्ठावंत योगेश पाटील व भाजप निष्ठावंत अशा दोन गटांच्या कार्यकर्त्यांत आरोप-प्रत्यारोप, झालेली धक्काबुक्की चर्चेचा विषय ठरली.

निवडणूक जाहीर होण्यापूर्वी भिवंडी-वाडा-मनोर या मंजूर झालेल्या रस्त्याचा भूमिपूजन सोहळा ७ मार्च रोजी कुडूस येथे होणार होता. हा मेळावा यशस्वी होण्याची जबाबदारी कार्यकर्ते योगेश पाटील व तालुका अध्यक्ष मंगेश पाटील यांच्यावर सोपवण्यात आली होती. परंतु मेळाव्याच्या सभा मंडपात कपिल पाटील यांनी प्रवेश करताच रिकाम्या खुर्च्या पाहून त्यांनी संताप व्यक्त केला. मेळाव्याच्या अल्प प्रतिसादाबद्दल पालकमंत्री रवींद्र चव्हाण व पालघर जिल्हाध्यक्ष भरत राजपूत यांच्याकडे काही कार्यकर्त्यांनी योगेश पाटील व मंगेश पाटील यांच्याबद्दल तक्रार केल्याचे समजले. कार्यकर्ता मेळाव्यात योगेश पाटील यांनी एका कार्यकर्त्यांची कॉलर पकडून धक्काबुक्की केली. आणि तक्रार करणाऱ्यावर शिवीगाळ केली.

या घटनेचे तालुक्यात तीव्र पडसाद उमटत आहेत. योगेश पाटील यांचे पक्षांच्या बांधणीत योगदान काय, असा सवाल करून कपिल पाटील हे योगेश पाटील यांना नेहमी अवाजवी महत्त्व का देतात, अशा चर्चा दबक्या आवाजात सुरू आहे. या नाराजीमुळेच ज्येष्ठ नेते बाबाजी काठोले, माजी जिल्हाध्यक्ष नंदकुमार पाटील, पंचायत समितीचे माजी उपसभापती जगन्नाथ पाटील आदी मेळाव्यात अनुपस्थित असल्याचे सांगितले जात आहे.

# विमानतळावर दोन ड्रग्ज तस्कर गजाआड

## महसूल गुप्तचर संचालनालयाच्या कारवाईत १०० कोटींचे कोकेन जप्त

■ **मुंबई** : भारतासह इथियोपिया, श्रीलंका आणि नायजेरियामधून चालणाऱ्या एका आंतरराष्ट्रीय ड्रग्ज रॅकेटचा महसूल गुप्तचर संचालनालयाने (डीआरआय) पर्दाफाश करत तब्बल १०० कोटी रुपये किमतीचे ९.८२९ किलो कोकेन जप्त केले आहे. याप्रकरणी दोन महिला प्रवाशांना अटक करण्यात आली आहे. इथियोपिया आणि अदिस अबाबा येथून येणाऱ्या महिला प्रवाशांकडे मोठ्या प्रमाणात अमली पदार्थ असल्याची माहिती मिळाल्यानंतर



डीआरआयच्या पथकाने शनिवारी मुंबई विमानतळावर सापळा रचून ही कारवाई केली. या वेळी इंडोनेशियामधील रहिवासी जिना गंतीनी रहायू (४४) नावाच्या महिला प्रवाशाला ताब्यात घेतले असता तिच्याजवळील ट्रॉली बॅगेत कार्बन पेपरमध्ये पांढऱ्या रंगाची भुकटी असलेले एक पाकीट सापडले. या भुकटीची तपासणी केली असता ते कोकेन असल्याचे निष्पन्न झाले.

या कोकेनचे वजन ४९३४ किलोग्रॅम होते. त्याचप्रमाणे थायलंडच्या महिला प्रवाशाकडून ४९३५ किलोग्रॅम कोकेन जप्त केले. डीआरआयने दोन्ही महिलांकडून मिळून एकूण ९८२९ किलोग्रॅम कोकेन जप्त केले असून त्याची आंतरराष्ट्रीय बाजारातील किंमत १०० कोटी रुपये आहे. दोन्ही महिला आंतरराष्ट्रीय टोळीशी संबंधित असल्याचे डीआरआयच्या तपासात समोर आले. यातील रहायू हिने यापूर्वीही अमली पदार्थांची भारतात तस्करी केली होती. हे कोकेन ती दिल्लीतील एका व्यक्तीला देणार होती; पण त्यापूर्वीच तिला अटक झाली. डीआरआयच्या पथकाने दिल्ली आणि नोएडा येथे सापळा रचून अमली पदार्थाचा साठा घेण्यासाठी आलेल्या व्यक्तीसह या टोळीच्या मुख्य सूत्रधारालाही ताब्यात घेतले आहे.

# भावंडांच्या मृत्यूप्रकरणात पालिकेच्या अधिकाऱ्यांवर निष्काळजीपणाचा ठपका



■ **मुंबई** : मुंबई महापालिकेच्या वन गार्डनमधील पाण्याच्या टाकीत पडून दोन भावंडांच्या झालेल्या मृत्यूप्रकरणात पालिकेच्या उद्यान विभागातील संबंधित अधिकाऱ्यांवर निष्काळजीपणाचा ठपका ठेवण्यात आला आहे. मुले बेपत्ता झाल्यानंतर माटुंगा पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यात भादंवि कलम ३०४ (अ)ची वाढ करत पोलिसांनी पुढील तपासला सुरुवात केली आहे. वडाळा रोड परिसरातील रहिवासी अंकुश वाघरी आणि अर्जुन वाघरी या दोन भावंडांचा रविवारी माटुंगा, महर्षी कर्वे रोड येथील पालिकेच्या वन गार्डनमधील पाण्याच्या टाकीत पडून मृत्यू झाला होता. दोन्ही मुलांचे मृतदेह सापडल्यानंतर रफी अहमद किडवाई मार्ग पोलिसांनी अपमृत्यूची नोंद करून तपास सुरू केला.

पोलिसांनी केलेल्या प्राथमिक तपासात पालिकेच्या उद्यान विभागातील संबंधित अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे ही घटना घडल्याचे समोर आले. मुले बेपत्ता झाली होती, तेव्हा माटुंगा पोलिसांनी याप्रकरणी अज्ञात आरोपी विरोधात अपहरणाचा गुन्हा दाखल केला होता. त्यामुळे अहमद किडवाई मार्ग पोलिसांनी अपमृत्यूच्या केलेल्या नोंदीचा पुढील तपास माटुंगा पोलिसांकडे वर्ग केला. निष्काळजीपणामुळे ही घटना घडल्याने दाखल गुन्ह्यातील कलमात वाढ करून पुढील तपास सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

# महामार्ग ओलांडणे बेतू शकते ग्रामस्थांच्या जीवावर

## चारोटी बसवतपाडा येथे बोगदा, उड्डाणपूल बांधण्याची मागणी

■ **डहाणू** : मुंबई-अहमदाबाद महामार्गावर ग्रामपंचायत चारोटी हद्दीत एशियन पेट्रोल पंपासमोर तांडेलपाडा व बसवत पाडा येथे उड्डाणपुल व भुयारी मार्ग बांधून देण्याची मागणी चारोटी ग्रामपंचायतीने राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे केली आहे. महामार्गावर चारोटी येथे धापशीपाडा, बसवत पाडा, तांडेलपाडा येथील ग्रामस्थांना दररोज महामार्ग ओलांडून पलीकडे जावे लागते. यामुळे अपघातांच्या घटना घडून लोकांना प्राण गमवावे लागत आहे. अपघात टाळण्यासाठी पेट्रोल पंप येथे उड्डाणपूल आणि भुयारी मार्ग बांधण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.



डहाणू-चारोटी राज्यमार्गावर चारोटी येथे बोगदा आहे. मात्र तांडेलपाडा आणि बसवतपाड दरम्यान पादचारी व लहान वाहनांसाठी बोगदा नसल्याने रहिवाशांना पलीकडे जाण्यासाठी जीव धोक्यात घालावा लागतो. अनेकदा वाहनांची धडक लागून लोकांना प्राण गमवावे लागले आहेत.त्यामुळे चारोटी ग्रामपंचायतीने बसवतपाडा येथे उड्डाणपूल आणि भुयारी मार्ग बांधण्याची राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे मागणी केली आहे. बसवतपाडा येथे दुभाजकाला बेकायदा मार्ग काढला आहे. यामुळे या कटमधून बेफाम वाहने मार्ग ओलांडतात. मात्र भरधाव वाहनांचा ताबा नियंत्रणात राहत नसल्याने अपघातांच्या घटना घडतात.

> “ मुंबई–अहमदाबाद महामार्गामुळे चारोटी ग्रामपंचायतीचे पाडे दुभगले आहेत. रहिवाशांना शाळा, दवाखाना, बाजारपेठसाठी महामार्ग ओलांडावा लागतो. रात्री–अपरात्री भरधाव वाहने दिसत नसल्याने अपघात घडतात. एशियन पेट्रोल पंप समोर उड्डाणपूल बांधण्याची मागणी केली आहे.
> – **कैलास चौरे**, माजी उपसरपंच, ग्रामपंचायत चारोटी

# लोकसभेच्या पार्श्वभूमीवर सराईत गुंड हद्दपार

## पालघर पोलिसांची प्रतिबंधात्मक कारवाई

■ **बोईसर** : लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था बिघडवणाऱ्या असामाजिक तत्त्वांवर पालघर पोलिसांनी प्रतिबंधात्मक कारवाई सुरू केली आहे. बोईसर पोलीस ठाणे हद्दीतील गंभीर गुन्हे दाखल असलेल्या दोन सराईत गुंडांना हद्दपार केले आहे. लोकसभा निवडणुकांची घोषणा करण्यात आली असून, निवडणूक काळात पालघर जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी पोलीस दलामार्फत प्रतिबंधात्मक



उपाययोजना केल्या जात आहेत. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बोईसर पोलीस ठाणे हद्दीतील अवधनगर व धोडीपूजा परिसरत राहत असलेले व गंभीर गुन्हे नोंद असलेले माया उर्फ महर्षी परशुराम काठे आणि मोहम्मद सद्दाम दिलदार हुसेन शेख या दोन सराईत गुंडांना पालघर व ठाणे, नाशिक व मुंबई उपनगर या चार जिल्ह्यांतून दोन वर्षांसाठी हद्दपार करण्यात आले आहे. बोईसर एमआयडीसी हे जिल्ह्यातील सर्वाधिक लोकसंख्या असलेले पोलीस ठाणे होय. तारापूर औद्योगिक वसाहतीमुळे या पोलीस ठाणे हद्दीत परप्रांतीय कामगारांची संख्या मोठी असल्याने गुन्हेगारीसुद्धा वाढू लागली आहे. मारहाण, दमदाटी, गंभीर दुखापत, चोरी, घरफोडी, अपहरण, अंमली पदार्थ विक्री, जुगार, मटका, यांसारखे गैरधंदे परिसरात फोफावत आहे.

# मुंबई–नाशिक महामार्गावर स्क्रॅपचा बेकायदा व्यवसाय तेजीत

## नेमका माल येतो कुठून आणि जातो कुठे? सर्वसामान्यांचा प्रशासनाला सवाल

■ **कसारा** : मुंबई नाशिक महामार्गावर कसारा ते खर्डी गाव दरम्यान स्क्रॅपचे अवैध व्यवसाय सुरू आहेत.यासाठी विविध हॉटेल ठिकाणी व रस्त्याच्या कडेला उभारण्यात आलेल्या शेडलगत दुकाने थाटण्यात आली आहेत. निरनिराळ्या वस्तूंचा,गाड्यांचा व इतर साहित्यांचा स्क्रॅप माल मोठया प्रमाणात इतर ठिकाणी पाठवला जातो.नेमका हा माल येतो कुठून जातो कुठे? याची उघडउघड चर्चा नागरिकांमध्ये आहे. मुंबई नाशिक महामार्गालाच समांतर म्हणा किंवा मुख्य रस्त्यापासून अवघ्या २ ते १० किमी अंतरावर समृद्धी महामार्गाचे काम सुरू आहे.तेथून मोठ्या प्रमाणावर पिकअप,टेम्पो आणि डंपर अशा गाड्यांमधून



अनेकदा स्क्रॅप माल लंपास करण्यात येतो.याबाबत पोलीस ठाण्यात गुन्ह्याच्या नोंदी देखील करण्यात आल्या आहेत.समृद्धी महामार्गातील होणाऱ्या चोऱ्यांच्या सत्रात तेथे नेमण्यात आलेली सुरक्षा रक्षक एजन्सी नेमकं करते काय? अशी शंका निर्माण होणे साहजिक आहे.लहान मोठया वाहनात भरून निघणारा भंगारचा माल हा मुंबई नाशिक महामार्गावरून लंपास केला जातो.

मात्र याचा फटका समृद्धी महामार्गात प्रामाणिक काम करणाऱ्या सुरक्षा रक्षकांच्या वेतनावर होत आहे.चोरी झाल्याने समृद्धी महामार्गात ठेकेदार पद्धतीवर नेमणूकीत असलेली नवयुगा कंपनी त्याची नुकसान भरपाई बिलातून कापून घेते असे उत्तर संबंधित कंपनीशी करारानुसार असलेल्या सुरक्षा रक्षक एजन्सीचे मालक सांगतात.यापूर्वी देखील सुरक्षा रक्षक पुरवठा ठेकेदाराने कसारा गावातील तरुण रोजगारांचे १२ हजार प्रति महिन्यांप्रमाणे २ महिन्यांचा पगार घेऊन लंपास झाल्याची घटना घडली आहे. याबाबत स्थानिक पोलिसांना माहिती देखील देण्यात आली होती.मात्र त्यावर कुठलीही कारवाई करण्यात आली नाही.मुंबई नाशिक मार्गावर थाटण्यात आलेल्या दुकानांमध्ये व दुकानांच्या आजूबाजूला मागेपुढे अवैदयरितीने स्क्रॅप माल पडलेला असतो.मार्च महिन्यांच्या पहिल्याच आठवड्यात अर्थात २ मार्च २०२४ रोजी मुंबई नाशिक महामार्गाच्या सेवा रस्त्याला व एका पत्रटी दुकानाच्या मागे लोखंडी सळईचे २ बंडल पोलिसांना आढळून आले होते.समृद्धी महामार्गात होणारी भंगार चोरी अनेकदा उघडकीस आली आहे.

◆परंतू पोलिसांना मिळालेले लोखंडी सळईचे बंडल हे नेमके समृद्धीच्या कामातील का रात्रीच्या वेळेस धावत्या वाहनातून उतरवलेले असावेत याबाबत अद्याप पोलिसांनी स्पष्ट केले नसल्याचे समजते .वारंवार घडणाऱ्या घटना रोखण्यासाठी भंगार चोरी व सद्यस्थितीत मुंबई नाशिक महामार्गावर विनापरवाना थाटण्यात आलेल्या भंगार दुकानांवर पोलीस कारवाई होणे अपेक्षित असल्याची चर्चा आसपासच्या नागरिकांमधून होत आहे .

# खारघरमध्ये चरसची विक्री करण्यासाठी आलेली दुकली जेरबंद

■ **नवी मुंबई** : खारघरमधील पापडीचा पाडा येथे चरस हे अमली पदार्थ विकण्यासाठी आलेल्या दुकलीला नवी मुंबई पोलिसांच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने शनिवारी सायंकाळी ४ वाजण्याच्या सुमारास अटक केली. अभिजीत चंद्रकांत तांडेल (३२) आणि उमेश सत्यनाथ सिंग (३८) अशी या कारवाईत अटक करण्यात आलेल्या दोघांची नावे आहेत. अमली पदार्थ विरोधी पथकाने त्यांच्या जवळ सापडलेले एकूण १८५३ ग्रॅम वजनाचे ५५ लाख ६८ हजार रुपये किमतीचे चरस हे अमली पदार्थ जप्त केले. या दोघांनी सदरचे चरस कुठून व कुणाला विक्री करण्यासाठी आणले होते. याचा पोलिसांकडून तपास करण्यात येत आहे.

नवी मुंबई पोलिसांच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नीलेश धुमाळ आपल्या पथकासह गत शनिवारी सायंकाळी ४ वाजण्याच्या सुमारास गस्त घालत खारघरमधून जात होते. या वेळी पापडीचा पाडा येथे योगेश पाटील व संभाजी जाधव हे दोघेही प्लास्टिकची पिशवी घेऊन उभे असल्याचे निदर्शनास आले. या वेळी पोलिसांची गाडी पाहून दोघांनी लपण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे त्यांच्यावर संशय आल्याने अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाच्या पथकाने त्यांना घेराव घालून ताब्यात घेतले. त्यानंतर पोलिसांनी त्यांच्या जवळ असलेल्या पिशवीची तपासणी केली असता, योगेश पाटील याच्याकडे ९७३ ग्रॅम व संभाजी जाधव याच्याकडे ८८३ ग्रॅम वचनाचे चरस हे अमली पदार्थ आढळून आले. त्यानंतर अमली पदार्थ विरोधी पथकाने या दोघांजवळ सापडलेले तब्बल ५५ लाख ६८ हजार रुपये किमतीचे चरस हे अमली पदार्थ जप्त करून सदरचे अमली पदार्थ त्यांनी कुठून आणले, याबाबत त्यांच्याकडे चौकशी केली असता, त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली.

# पोलिसांनी जप्त केलेल्या वाहनांना आग

■ **कल्याण**: कल्याण पश्चिमेतील जोशीबाग परिसरात जुन्या पोलीस लाईनच्या परिसरात पोलीसांनी जप्त करून ठेवलेल्या वाहनांना दुपारी अचानक मोठी आग लागली. या आगीत सुमारे ५० दुचाकी आणि तीन रिक्षा जळून खाक झाल्या. जोशीबाग परिसरातील मच्छी मार्केटच्या मागील बाजूस पोलिसांनी विविध प्रकरणांमध्ये १० वर्षांपूर्वी जप्त केलेली दुचाकी वाहने मोठया



प्रमाणात ठेवण्यात आलेली होती. दुपारच्या सुमारास या ठिकाणी आग लागली. क्षणार्धात ही आग पसरल्याने परिसरातून मोठया प्रमाणावर धूर बाहेर येऊ लागला. त्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले.या आगीत येथील दुचाकी आणि रिक्षा वाहनांचे नुकसान झाले. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन विभागाच्या तीन वाहनांनी घटनास्थळी धाव घेत अर्ध्या तासात आगीवर नियंत्रण मिळवले.

# दुबईतील व्यावसायिकाची ११ कोटींची फसवणूक

## मुंबईतील मालमत्ता देण्याचे आमिष

■ **मुंबई** : पश्चिम उपनगरातील एका मालमत्तेत ४५ टक्के हिस्सा देण्याचे आमिष दाखवून दुबईतील व्यावसायिकाकडून ११ कोटी रुपये घेत त्यांची फसवणूक करण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. या व्यावसायिकाने दिलेल्या तक्रारीवरून या प्रकरणी गुन्हा दाखल करून माटुंगा पोलीस अधिक तपास करत आहेत. दुबईतील रहिवासी असलेल्या ५२ वर्षीय तक्रारदार यांचा पॉपर्टी मॅनेजमेंटचा व्यवसाय आहे. तसेच ते भावासोबत मिळून रिअल इस्टेट डेव्हलपमेंटचा व्यवसाय करत आहेत. त्यांच्या ओळखीच्या धनजी गाला याने गजानन बिल्डर्स कंपनीचे भागीदार अब्दुल जहद वाजिद खान, समीर अब्दुल अहद वाजिद खान,




सैफ अहद खान यांच्याशी ओळख करून दिली. या सर्वांनी तक्रारदार यांना जोगेश्वरी पूर्वेकडील रिलिफ रोडवरील एक मालमत्ता दाखवून या मालमत्तेतील ४५ टक्के हिस्सा देतो, असे सांगून ३० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यास सांगितले. त्यानंतर, आरोपींनी तक्रारदार यांच्याकडून ११ कोटी रुपये उकळले. मालमत्तेमध्ये मिळणारा ४५ टक्के फायदा दिला नाही. तसेच तक्रारदार यांच्याकडून घेतलेली रक्कमसुद्धा परत केली नाही. अखेर, आपली फसवणूक झाल्याची खात्री झाल्याने तक्रारदार यांनी माटुंगा पोलीस ठाणे गाठून तक्रार दिली आहे.